दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

## सुविचार

ध्येय स्पष्ट असेल तर अडथळ्यांमुळे आपली दिशा बदलत नाही, ते फक्त संयम शिकवतात आणि यशासाठी स्वतःवरचा विश्वास अधिक घट्ट करतात, मनाला बळ देतात.

## पोलिसांची कडक कारवाई

**पुणे:** पुणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलिसांकडून कडक पावले उचलण्यात आली असून, परिमंडळ दोनच्या हद्दीतील ७०६ सराईत गुन्हेगारांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे आदेश पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते यांनी दिले आहेत.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 — सोमवार, दि. १२ जानेवारी, २०२६ — वर्ष - १ अंक - ११० पाने - ४ — पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### सोनिया गांधी रुग्णालयातून घरी

**नवी दिल्ली :** छातीच्या संसर्गामुळे ब्रोन्कियल दम्याचा त्रास वाढल्याने सुमारे एक आठवड्यापूर्वी येथील सर गंगाराम रुग्णालयात दाखल झालेल्या काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांना रविवारी डिस्चार्ज देण्यात आला, असे रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यांनी उपचारांना चांगला प्रतिसाद दिला आहे आणि त्यांची प्रकृती चांगली असल्याचे असे त्यांनी सांगितले. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, सोनिया गांधींना आज संध्याकाळी ५ वाजता रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला, तसेच त्यांच्या निवासस्थानी पुढील उपचार सुरू ठेवण्याचा सल्ला देण्यात आला, असे त्यांनी म्हटले आहे.

### बँक खात्यातून परस्पर १.५४ लाख काढले

**चायबासा :** झारखंडच्या पश्चिम सिंहभूम जिल्ह्यातील एका व्यक्तीच्या बँक खात्यातून १.५४ लाख रुपये फसवणूक करून काढल्याप्रकरणी बिहारच्या गया जिल्ह्यातून एका व्यक्तीला अटक करण्यात आली, अशी माहिती पोलिसांनी रविवारी दिली. गेल्या महिन्यात झालेल्या एटीएम फसवणुकीच्या चौकशीनंतर प्रिन्स कुमार (२६) असे आरोपीला अटक करण्यात आली, असे त्यांनी सांगितले. मुकू बारी चाईबासा एटीएममधून पैसे काढण्यासाठी गेला होता तेव्हा त्याचे एटीएम कार्ड मशीनमध्ये अडकले होते. त्याचा वापर आरोपीने केला.

### राजस्थानात ड्रग्ज तस्कराला अटक

**जयपूर :** राजस्थान पोलिसांनी रविवारी एका कथित ड्रग्ज तस्कराला अटक केली आणि ८५ ग्रॅम स्मॅक जप्त केले, ज्याची किंमत अंदाजे १७ लाख रुपये आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. ही कारवाई शहरात ड्रग्जविरुद्ध सुरू करण्यात आलेल्या "ऑपरेशन क्लीन स्वीप" या विशेष मोहिमेचा एक भाग होती, असे त्यांनी सांगितले. क्राइम स्पेशल टीमने येथील भोजपुरा कच्ची बस्ती परिसरात छापा टाकला.

## मुंबईकरांसाठी भरमसाठ आश्वासने

# महायुतीची पुन्हा 'लाडकी बहिण'

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीकडून वचननामा जाहीर करण्यात आला. विधानसभेवेळी ज्याप्रमाणे लाडकी बहिण योजना आणण्यात आली, तशाच पद्धतीने भरमसाठ आश्वासने देण्यात आली आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीत हा वचननामा प्रसिद्ध करण्यात आला. सुमारे दोन लाख नागरिकांच्या सूचनांचा विचार करून हा दस्तावेज तयार करण्यात आल्याचे महायुतीकडून सांगण्यात आले.

वचननाम्यात झोपडपट्टीमुक्त मुंबई, २० ते ३५ लाख घरांची निर्मिती, पाच वर्षांसाठी पाणीपट्टी वाढीला स्थगिती, धारावी पुनर्विकास, बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय विद्यापीठाची स्थापना, लघु उद्योजकांसाठी बिनव्याजी कर्ज यांसारख्या महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या आहेत.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, मुंबई महापालिका निवडणूक १५ तारखेला होत असून, हा वचननामा मुंबईकरांच्या दैनंदिन जीवनात बदल घडवणारा ठरेल. १६ तारखेला महापालिकेवर महायुतीचा भगवा फडकेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अडीच वर्ष मुख्यमंत्रीपदाच्या काळात आणि त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मुंबईच्या विकासासाठी महत्त्वाची कामे झाली असल्याचा दावा त्यांनी केला. मुंबईत आलेल्या मराठी माणसाचे रक्षण आणि संस्कृती जपणे हे आपले कर्तव्य असल्याचेही शिंदे म्हणाले.

मुंबई पागडीमुक्त करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगत शिंदे यांनी ओसीअभावी वाढणारी पाणीपट्टी थांबवण्यात आल्याचा उल्लेख केला. झोपडपट्टीमुक्त मुंबई हे शिवसेना प्रमुखांचे स्वप्न असून ते पूर्ण करण्याचा निर्धार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. रमाबाई आंबेडकर नगरमधील पुनर्विकास, गिरणी कामगारांना घरे, तसेच दीर्घकाळ भाडे न मिळालेल्या रहिवाशांसाठी तरतूद करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

लाडक्या बहिणीसाठी बेस्ट बसभाड्यात ५० टक्के सवलत देण्याची घोषणा करताना शिंदे यांनी २० ते ३५ लाख घरे उभारण्याचा मानस असल्याचे नमूद केले. बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी वर्ष महापालिकेच्या माध्यमातून साजरे करण्यात येणार असून बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय विद्यापीठ स्थापन केले जाईल, असेही त्यांनी सांगितले. लघु उद्योजकांना पाच लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज देण्यात येईल आणि पुनर्विकास प्रकल्पांना अडथळे येऊ दिले जाणार नाहीत, असे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, महायुतीचा वचननामा हा कामाच्या ट्रॅक रेकॉर्डवर आधारित आहे. पुढील पाच वर्षांनंतर केलेल्या कामांचा अहवाल जनतेसमोर मांडण्यात येईल, असे ते म्हणाले. मुंबईकरांना मुंबईबाहेर जावे लागू नये यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बीडीडी चाळ, अभ्युदय नगर आणि विशाल सह्याद्री नगर यांचे पुनर्विकास हे त्याचे उदाहरण असल्याचे त्यांनी नमूद केले.

## ही निवडणूक अस्मितेची आदित्य ठाकरेंचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** ही निवडणूक केवळ सत्तेची नाही, तर आपल्या अस्मितेची आणि आपल्या गल्लीतल्या प्रश्नांची आहे. इतर कोणत्याही गोष्टींकडे लक्ष न देता मुंबईकरांनी सजगपणे निर्णय घ्यावा," असे आवाहन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांनी केले. दादर येथील शिवतीर्थावर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मनसे यांच्या संयुक्त सभेत ते बोलत होते.

या वेळी आदित्य ठाकरे यांनी भारतीय जनता पक्षावर जोरदार टीका केली. भाजपच्या सत्ताकाळात भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणावर वाढल्याचा आरोप करत ते म्हणाले की, भाजपने केवळ आश्वासनांची खैरात केली, तर शिवसेनेने मुंबईत प्रत्यक्ष विकासकामे करून दाखवली आहेत. "आमची कामे मुंबईकरांच्या डोळ्यांसमोर आहेत आणि जनता त्याच आधारे निर्णय घेईल," असे त्यांनी सांगितले.

सभेदरम्यान आदित्य ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मिमिक्री करत टोला लगावला. घुसखोरांच्या मुद्द्यावरून त्यांनी थेट सवाल उपस्थित केला. "तुम्ही गृहमंत्री आहात, मग इतक्या वर्षांत बांगलादेशी घुसखोरांना का पकडू शकला नाहीत?" असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

पाण्यावर कर लावल्याच्या आरोपांनाही आदित्य ठाकरे यांनी प्रत्युत्तर दिले. "आम्ही पाण्यावर कोणताही कर लावलेला नाही. उलट मुंबई महानगरपालिकेत ९२ हजार कोटी रुपयांच्या ठेवी ठेवल्या आहेत," असे ते म्हणाले. लाडकी बहीण योजनेवरूनही त्यांनी भाजपवर टीका करत, "आधी लाडक्या बहिणींना २१०० रुपये द्या, त्यानंतर आमच्यावर टीका करा," असा टोला लगावला.

## संपूर्ण देशच विकायला काढला आहे राज ठाकरे यांचा खळबळजनक आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव) आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शिवाजी पार्क मैदानात संयुक्त सभा आयोजित केली. ही सभा ठाकरे बंधूंची पहिली संयुक्त सभा असून, मुंबईकरांसमोर राजकीय आणि आर्थिक मुद्द्यांवर थेट भाष्य करण्यासाठी आयोजित केली होती.


या सभेत राज ठाकरे यांनी २०१४ ते २०२५ या काळात उद्योगपती गौतम अदानी यांना मिळालेल्या प्रोजेक्ट्स आणि त्यांच्या साम्राज्याची वाढ याची सविस्तर माहिती दिली. त्यांनी देशाचा नकाशा दाखवत अदानींच्या उद्योगांचे विस्तार स्पष्ट केले. राज ठाकरेंनी सांगितले की, मुंबई, महाराष्ट्र आणि देशाचे काही भाग विकायला काढले गेले आहेत आणि सामान्य नागरिकांना काय घडत आहे याची जाणीव नाही.

राज ठाकरेंनी सांगितले की, २०२४ नंतर एका व्यक्तीकडून मिळालेल्या माहितीनंतर त्यांच्या रिसर्च टीमने अदानींच्या साम्राज्याचा अभ्यास केला. त्या अभ्यासात दिसून आले की, सरकारच्या आशीर्वादामुळेच या ११ वर्षांत अदानींच्या उद्योगांनी मोठा विस्तार केला. त्यांनी नागरिकांना विचार करण्यास प्रवृत्त करत म्हटले की, लोकांनी या विषयावर लक्ष ठेवणे गरजेचे आहे. राज ठाकरेंनी स्पष्ट केले की, माध्यमांवर या विषयावर माहिती मर्यादित आहे आणि नागरिकांना सगळे तथ्य दिसत नाहीत, असेही ते म्हणाले.

## मसूद अझहरच्या व्यक्तव्याने खळबळ

# हजारो आत्मघाती दहशतवादी तयार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** पाकिस्तानस्थित बंदी घातलेल्या दहशतवादी संघटनेचा प्रमुख मौलाना मसूद अझहर याची ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने खळबळ उडाली आहे. या ऑडिओमध्ये अझहरकडून हजारो आत्मघाती दहशतवादी तयार असल्याचे दावे करण्यात आले आहेत. मात्र, या ऑडिओची अधिकृतपणे अद्याप पुष्टी झालेली नसून सुरक्षा यंत्रणा त्याची तपासणी करत आहेत.

यात मसूद अझहर आपल्या ताकदीचे प्रदर्शन करताना ऐकू येतो. आपल्याकडे मोजके नव्हे तर मोठ्या संख्येने फिदायीन तयार असल्याचा दावा तो करत असून, खरी संख्या समोर आली तर जग हादरेल, असेही तो म्हणतो. या कथित ऑडिओनुसार, हे आत्मघाती दहशतवादी कोणत्याही भौतिक लाभासाठी किंवा वैयक्तिक फायद्यासाठी नव्हे, तर केवळ शहीद होण्यासाठी तयार असल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच, भारतात घुसखोरीसाठी कार्यकर्त्यांकडून आपल्यावर दबाव असल्याचेही तो सांगतो.

हा दावा अशा वेळी समोर आला आहे, जेव्हा पुलवामा, पठाणकोट आणि अलीकडील पहलगाम हल्ल्यांनंतर भारताने जैश-ए-मोहम्मदच्या तळांवर सातत्याने कठोर कारवाया केल्या आहेत. पहलगाम हल्ल्यानंतर सुरू करण्यात आलेल्या ऑपरेशन सिंदूरमध्ये जैशच्या अनेक तळांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, या कारवाईत मसूद अझहरचे काही जवळचे सहकारी, नातेवाईक आणि संघटनेतील दहशतवादी ठार झाले आहेत.

मसूद अझहर २०१९ पासून सार्वजनिकपणे दिसलेला नाही. त्याच वर्षी बहावलपूरमधील त्याच्या कथित लपण्याच्या ठिकाणी झालेल्या स्फोटातून तो थोडक्यात बचावला होता. त्यानंतर तो भूमिगत झाला असून, त्याच्या हालचालींबाबत विरोधाभासी माहिती समोर येत आहे. अलीकडील गुप्तचर माहितीनुसार, तो बहावलपूरपासून दूर असलेल्या पाकिस्तानव्याप्त भागात सक्रिय असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

संयुक्त राष्ट्रांनी जागतिक दहशतवादी म्हणून घोषित केलेला मसूद अझहर भारतातील अनेक भीषण हल्ल्यांचा सूत्रधार मानला जातो. २०१६ मधील पठाणकोट हवाई तळावरील हल्ला आणि २०१९ मधील पुलवामा आत्मघाती बॉम्बस्फोट, ज्यात ४४ सीआरपीएफ जवान शहीद झाले होते, या हल्ल्यांमागे त्याची भूमिका असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या या ऑडिओमागील सत्यता, त्याचा स्रोत आणि त्यामागचा उद्देश यांचा सखोल तपास सुरू असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले आहे. सुरक्षा यंत्रणा परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

## स्थानिक स्वराज्य निवडणुकांबाबत अनिश्चितता

### आयोगाची सर्वोच्च न्यायालयात मुदतवाढीची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वाची घडामोड घडली आहे. राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात अर्ज दाखल करून १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी १० फेब्रुवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याची मागणी केली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी ३१ जानेवारी २०२६ पर्यंत सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण करण्याचे आदेश दिले होते. मात्र प्रशासकीय व तांत्रिक अडचणींमुळे ही प्रक्रिया वेळेत पूर्ण होणे कठीण असल्याचा दावा आयोगाने आपल्या अर्जात केला आहे. त्यामुळे निवडणुका घेण्यासाठी आणखी दहा दिवसांची मुदत देण्यात यावी, अशी विनंती करण्यात आली आहे.

या अर्जावर सोमवारी (दि. १२ जानेवारी) तातडीने सुनावणी होण्याची शक्यता असून, सर्वोच्च न्यायालय मुदतवाढ देणार की आधीचे आदेश कायम ठेवणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. न्यायालयाच्या निर्णयावर जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांचे वेळापत्रक ठरणार आहे.

दरम्यान, वसई-विरार महानगरपालिकेच्या निवडणुकीबाबतही अनिश्चितता निर्माण झाली आहे. या निवडणुकीला तात्पुरती स्थगिती द्यावी, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. याचिकेनुसार, महानगरपालिका क्षेत्रात काही गावांचा समावेश ऐनवेळी करण्यात आल्याने कायदेशीर पेच निर्माण झाला आहे. या गावांच्या समावेशाला आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित असून, अद्याप त्यावर अंतिम निर्णय झालेला नाही. उच्च न्यायालयाचा निकाल लागेपर्यंत निवडणूक प्रक्रिया थांबवावी, अशी मागणी याचिकाकर्त्यांनी केली आहे. या प्रकरणावर सोमवारी सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर तातडीची सुनावणी होणार आहे. सर्वोच्च न्यायालय या याचिकेवर कोणते निर्देश देते, यावर वसई-विरार महानगरपालिका निवडणुकीचे भवितव्य अवलंबून राहणार आहे.

## पूजा खेडकर यांच्या बंगल्यात घरगड्यानेच घातला दरोडा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** वादग्रस्त ठरलेल्या माजी प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्या बाणेर येथील निवासस्थानी शनिवारी रात्री खळबळजनक प्रकार घडला. त्यांच्याच घरी कामाला असलेल्या एका नोकराने पूजा यांच्या आई-वडिलांना अन्नातून गुंगीचे औषध देऊन बेशुद्ध केले आणि सर्वांचे मोबाईल घेऊन पळ काढला. या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली असून चतुःश्रृंगी पोलीस तपास करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित संशयित कामगार अवघ्या आठ दिवसांपूर्वीच नेपाळवरून खेडकर यांच्या घरी कामासाठी आला होता. शनिवारी रात्री त्याने दिलीप खेडकर आणि मनोरमा खेडकर यांना गुंगीचे औषध दिले, ज्यामुळे ते बेशुद्ध पडले. त्यानंतर आरोपीने पूजा खेडकर यांनाही एका ठिकाणी बांधून ठेवले आणि घरातील सर्वांचे मोबाईल फोन गोळा करून तिथून पळ काढला. या अनपेक्षित प्रकारानंतर पूजा खेडकर यांनी स्वतःची सुटका करून घेतली आणि तातडीने पोलिसांशी संपर्क साधला.

घटनेची माहिती मिळताच चतुःश्रृंगी पोलिसांनी खेडकर यांच्या बंगल्यावर धाव घेतली. यावेळी दिलीप आणि मनोरमा खेडकर हे दोघेही निपचित पडलेले आढळले, त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. आता त्यांची प्रकृती स्थिर असून ते धोक्याबाहेर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. पूजा खेडकर यांनी याबाबत पोलिसांना प्राथमिक माहिती दिली आहे.

## भारतीय निर्यातदारांचा युरोपकडे मोर्चा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अमेरिकेने भारतीय वस्तूंवर लादलेल्या ५० टक्के आयात शुल्काचा फटका बसल्यानंतर भारतीय निर्यातदारांनी पर्यायी बाजारपेठांचा शोध घेण्यास सुरुवात केली असून, त्याचा थेट फायदा युरोपियन देशांना होताना दिसत आहे.

वाणिज्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, युरोपियन युनियनमधील स्पेन, जर्मनी, बेल्जियम आणि पोलंड हे देश भारतीय वस्तूंसाठी महत्त्वाचे निर्यात केंद्र म्हणून पुढे येत आहेत.

चालू आर्थिक वर्षात एप्रिल ते नोव्हेंबर या कालावधीत युरोपकडे भारताच्या निर्यातीत लक्षणीय वाढ नोंदवली गेली आहे. विशेषतः स्पेन हा भारतीय निर्यातीसाठी सर्वात वेगाने वाढणारा युरोपीय बाजार ठरला आहे. या आठ महिन्यांच्या कालावधीत स्पेनला होणारी निर्यात ५६ टक्क्यांहून अधिक वाढली असून, ती मागील वर्षीच्या ३ अब्ज डॉलरवरून वाढून ४.७ अब्ज डॉलरवर पोहोचली आहे. त्यामुळे भारताच्या एकूण निर्यातीत स्पेनचा वाटा २.४ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. त्याचप्रमाणे जर्मनीलाही भारतीय निर्यातीत स्थिर वाढ दिसून आली आहे.

एप्रिल ते नोव्हेंबर या कालावधीत जर्मनीला होणारी निर्यात ९.३ टक्क्यांनी वाढून ६.८ अब्ज डॉलरवरून ७.५ अब्ज डॉलर झाली आहे. भारताच्या एकूण निर्यातीत जर्मनीचा वाटा २.६ टक्के असून, त्यातही वाढ झाली आहे. जर्मनीकडून भारतीय उत्पादनांना सातत्याने मागणी राहिल्याचे अधिकाऱ्यांनी नमूद केले.

बेल्जियम आणि पोलंडही या यादीत मागे नाहीत. २०२५-२६ या आर्थिक वर्षातील एप्रिल ते नोव्हेंबर कालावधीत बेल्जियमला होणारी भारतीय निर्यात ४.२ अब्ज डॉलरवरून वाढून ४.४ अब्ज डॉलर झाली आहे. पोलंडला होणारी निर्यातही याच काळात ७.६ टक्क्यांनी वाढून १.८२ अब्ज डॉलरवर पोहोचली आहे, जी मागील वर्षी १.६९ अब्ज डॉलर होती. अधिकाऱ्यांच्या मते, हे चित्र भारताच्या बदलत्या निर्यात धोरणाचे द्योतक आहे.

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा दावा; मिशन २०२६ चे उद्घाटन

# केरळमध्ये आज महापौर झाला, उद्या मुख्यमंत्रीही होईल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**तिरुअनंतपुरम :** केरळमध्ये आगामी विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्ष सत्तेत येईल, असा ठाम दावा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी रविवारी केला. तिरुअनंतपुरम येथे 'मिशन २०२६' कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नवनिर्वाचित भाजप प्रतिनिधींना संबोधित करताना त्यांनी विधानसभेच्या प्रचाराचा बिगुल वाजवला.

केरळ आणि पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुका एकाच वेळी होणार असून, दोन्ही राज्यांमध्ये भाजप सरकार स्थापन करेल, असा विश्वास शहा यांनी व्यक्त केला. या निवडणुका एकत्र होत आहेत, हे चांगले आहे. अन्यथा काँग्रेस आणि कम्युनिस्ट पक्षांनी परस्पर युती केली असती.

अलिकडच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएने तिरुअनंतपुरम महानगरपालिकेवर ऐतिहासिक विजय मिळवल्यानंतर शहा पहिल्यांदाच केरळच्या राजधानीत आले होते. या दौऱ्यात त्यांनी सत्ताधारी डाव्या आघाडीवर आणि काँग्रेस नेतृत्वाखालील संयुक्त लोकशाही आघाडीवर जोरदार टीका केली. जगभरातून साम्यवाद संपला असून भारतात काँग्रेस संपली आहे, असा हल्लाबोल त्यांनी केला.

केरळचा विकास केवळ भाजपच्या नेतृत्वाखालीच शक्य आहे, असा दावा करत शहा यांनी पक्षाच्या वाढत्या प्रभावाकडे लक्ष वेधले. २०१४ मध्ये केरळमध्ये भाजपचा मतांचा वाटा ११ टक्के होता, तो २०१९ मध्ये १६ टक्के आणि २०२४ मध्ये सुमारे २० टक्क्यांपर्यंत पोहोचल्याचे त्यांनी सांगितले. २०२६ पर्यंत हा वाटा ३० ते ४० टक्क्यांपर्यंत वाढवणे शक्य असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भाजपच्या राष्ट्रीय विस्ताराचा संदर्भ देताना त्यांनी आसाम, मणिपूर, त्रिपुरा आणि उत्तर प्रदेशातील सत्तास्थापनेची उदाहरणे दिली. पुढील संधी केरळची असून २०२६ मध्ये येथे भाजपचा मुख्यमंत्री असेल, असे शहा म्हणाले. भाजपचा प्रभाव केवळ शहरी भागापुरता मर्यादित नसल्याचे नमूद करत त्यांनी सांगितले की, पक्षाने ३० ग्रामपंचायती, दोन नगरपालिका आणि तिरुअनंतपुरम महानगरपालिका जिंकली आहे. याशिवाय ७९ पंचायत समित्यांमध्ये भाजप दुसऱ्या क्रमांकावर आहे. आज तिरुअनंतपुरममध्ये भाजपचा महापौर आहे, उद्या केरळमध्ये भाजपचा मुख्यमंत्री असेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

केरळमध्ये भाजपचा प्रवास सोपा नव्हता, असे सांगत शहा म्हणाले की, राज्यात पक्षाकडे दीर्घकाळ सत्ता नव्हती, मात्र समर्पित कार्यकर्त्यांच्या बळावर ही वाटचाल शक्य झाली. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील यश हे अंतिम ध्येय नसून, केरळमध्ये भाजप सरकार स्थापन करणे हेच उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

एलडीएफ आणि यूडीएफवर मॅच-फिक्सिंगचा आरोप करत शहा यांनी सांगितले की, या दोन आघाड्यांच्या परस्पर समजुतीमुळे केरळच्या विकासाला अडथळे आले आहेत. पीएफआय, एसडीपीआय आणि जमात-ए-इस्लामीसारख्या संघटनांवरही त्यांनी टीका केली आणि अशा शक्ती केरळच्या सुरक्षिततेस धोका असल्याचा आरोप केला.

## मणिशंकर अय्यरांवर भाजपची जोरदार टीका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** ऑपरेशन सिंदूरबाबत केलेल्या वक्तव्यामुळे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मणिशंकर अय्यर पुन्हा एकदा भाजपच्या निशाण्यावर आले आहेत. अय्यर यांनी भारत सरकारला ऑपरेशन सिंदूर थांबवून पाकिस्तानशी संवाद साधण्याचा सल्ला दिल्यानंतर भाजपने काँग्रेसवर पाकिस्तानबाबत मवाळ भूमिका घेतल्याचा आरोप करत जोरदार टीका केली आहे.

सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडिओमध्ये अय्यर भारत-पाकिस्तान संबंध सुधारण्यासाठी संवादाची गरज असल्याचे सांगताना दिसतात. या पार्श्वभूमीवर भाजपचे प्रवक्ते शहजाद पूनावाला यांनी प्रतिक्रिया देत काँग्रेस पक्षावर दहशतवादाबाबत भारताची भूमिका कमकुवत केल्याचा आरोप केला. काँग्रेस नेहमीच पाकिस्तानची बाजू घेत असल्याचा दावा करत त्यांनी पक्षावर सडकून टीका केली.

पूनावाला यांनी काँग्रेसची खिल्ली उडवत म्हटले की, हा पक्ष भारतीय राष्ट्रीय काँग्रेस नसून इस्लामाबाद राष्ट्रीय काँग्रेस आहे. सोशल मीडिया पोस्टमध्ये त्यांनी नमूद केले की, काँग्रेसचे वरिष्ठ नेते ऑपरेशन सिंदूर थांबवण्याची भाषा करत असून, त्यामुळे पाकिस्तानबाबत काँग्रेसची भूमिका पुन्हा उघड झाली आहे.

ते म्हणाले की, काँग्रेसची ओळख ही विरोधाभासी आहे. एकीकडे ते सैन्याबद्दल आदर व्यक्त करतात, तर दुसरीकडे त्यांच्या कारवायांवर प्रश्नचिन्हे उपस्थित करून सैन्याचा अपमान करतात, असा आरोप त्यांनी केला.

## सारांश वृत्त

### वडगाव आनंद शाळेत बालआनंदी बाजार; उलाढाल ४५ हजार रुपये

**आळंदी :** येथील पुणे-आळंदी पालखी मार्गावरील वडमुखवाडी येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका मंदिरात श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री विठ्ठल-रुक्मिणी मूर्ती प्राणप्रतिष्ठापना वर्धापन दिन तसेच श्री संत निवृत्तीनाथ महाराज त्र्यंबकेश्वर यात्रा उत्सवानिमित्त १४ ते २३ जानेवारी २०२५ या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या काळात ज्ञानेश्वरी व गाथा पारायण, भजन, हरिपाठ, कीर्तन, हरीजागर व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून नामवंत कीर्तनकारांची कीर्तन सेवा होणार आहे.

### 'पत्ता' विचारण्याच्या बहाण्याने महिलांची फसवणूक

**शिरूर :** सरदवाडी (ता. शिरूर) आणि शिरूर शहरातील जोशीवाडी परिसरात पत्ता विचारण्याच्या बहाण्याने दुचाकीस्वार चोरट्यांनी महिलांना संभाषणात गुंतवून त्यांच्या गळ्यातील अंदाजे चार तोळे सोन्याचे दागिने हिसकावून नेल्याच्या दोन घटना घडल्या. पहिल्या घटनेत रोहिणी सरोदे, तर दुसऱ्या घटनेत रंजना मेंगवडे या महिलांना लक्ष्य करण्यात आले. दोन्ही प्रकरणी अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध सुरू आहे.

### अष्टापुरमध्ये दुसरा बिबट्या जेरबंद

**वाघोली :** हवेली तालुक्यातील अष्टापुर येथील खोलशेत परिसरात वन विभागाच्या पथकाने दुसऱ्या बिबट्याला जेरबंद करण्यात यश मिळवले आहे. गेल्या ११ दिवसांत दुसरा बिबट्या पकडण्यात आल्याने परिसरातील नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला आहे. दोन दिवसांपूर्वी याच बिबट्याने अष्टापुर माळवाडीतील बिरोबाचा माळ परिसरात चार मेंढ्या ठार केल्या होत्या. बिबट्या जेरबंद झाल्याने मेंढपाळांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

## निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच इच्छुकांची मोर्चेबांधणी; गुप्त बैठकांमुळे राजकीय वातावरण तापले

# तळेगाव ढमढेरे गटात लवकरच राजकीय भूकंप?

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**तळेगाव ढमढेरे :** शिरूर तालुक्यातील राजकारणाचा कणा समजल्या जाणाऱ्या तळेगाव ढमढेरे जिल्हा परिषद गटात सध्या प्रचंड राजकीय हालचाली सुरू असून निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याआधीच संभाव्य राजकीय भूकंपाची चाहूल लागली आहे. येत्या काही दिवसांत जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा बिगुल वाजण्याची शक्यता असल्याने या गटातील प्रत्येक हालचाल संपूर्ण तालुक्याचे लक्ष वेधून घेत आहे. इच्छुक उमेदवार, स्थानिक नेते आणि पक्षीय पदाधिकाऱ्यांच्या हालचालींमुळे राजकीय वातावरण तापले आहे.

तळेगाव ढमढेरे गट हा नेहमीच चुरशीच्या लढतीसाठी ओळखला जातो. प्रमुख राजकीय पक्षांचे वजनदार नेते, माजी लोकप्रतिनिधी आणि प्रभावी स्थानिक कार्यकर्ते या गटात सक्रिय असल्याने यंदाही लढत रंगतदार होण्याची चिन्हे आहेत. ग्रामपंचायत, सहकारी संस्था आणि बाजार समितीच्या निवडणुकांतून दिसून आलेली गटबाजी आता थेट जिल्हा परिषद निवडणुकीत उतरू लागल्याचे चित्र आहे. आपला माणूस पुढे नेण्यासाठी स्थानिक पातळीवर जोरदार प्रयत्न सुरू असून, त्यातून अंतर्गत सत्तासंघर्ष उफाळून येत आहे.

निवडणूक लवकर जाहीर व्हावी यासाठी इच्छुकांचा आग्रह वाढला आहे. जानेवारी अखेरपर्यंत निवडणूक न झाल्यास दहावी-बारावीच्या परीक्षांमुळे निवडणूक कार्यक्रम पुढे ढकलला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे आर्थिक गणित, प्रचाराची तयारी आणि कार्यकर्त्यांचे मनोबल या सगळ्यांवर परिणाम होण्याची भीती इच्छुकांमध्ये आहे. याच कारणामुळे अनेक नेते वरिष्ठ पातळीवर संपर्क साधून निवडणुका वेळेत व्हाव्यात यासाठी प्रयत्नशील असल्याची चर्चा आहे. मागील पंचवार्षिक निवडणुकीतील जखम अजूनही ताजी असल्याचे या गटातील राजकीय चर्चांमधून स्पष्ट होते. त्या वेळी जिल्हा परिषद व पंचायत समितीचे सदस्य अपक्ष निवडून आल्याने प्रमुख राजकीय पक्षांना मोठा फटका बसला होता. उमेदवारीवरून झालेली गटबाजी, समन्वयाचा अभाव आणि अंतर्गत मतभेद यामुळे पक्षांची ताकद कमी झाली होती. हीच चूक पुन्हा होऊ नये म्हणून यंदा वरिष्ठ नेत्यांकडून समन्वय साधण्याचे प्रयत्न सुरू असले, तरी स्थानिक पातळीवरील नाराजी पूर्णपणे कमी झालेली नाही.

सध्या प्रत्येक पक्षात इच्छुकांची रांग लागली असून, अनेकांनी गावोगावी जनसंपर्क, बैठकांचे सत्र आणि कार्यकर्त्यांशी संवाद सुरू केला आहे. मात्र अधिकृत उमेदवारी कोणाला मिळणार, याबाबत अनिश्चितता असल्याने अस्वस्थता वाढली आहे. तिकीट नाकारले गेल्यास अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याची कुजबुज सुरू झाल्याने पक्षीय नेत्यांची डोकेदुखी वाढली आहे.

अपक्ष उमेदवारीचा पर्याय पुन्हा चर्चेत आल्यास निवडणूक समीकरणे पूर्णपणे बदलण्याची शक्यता नाकारता येत नाही.

एकूणच तळेगाव ढमढेरे जिल्हा परिषद गटात निवडणुकीपूर्वीच राजकीय हालचालींना वेग आला असून पडद्यामागील घडामोडी, गुप्त बैठकांचे सत्र आणि अंतर्गत सत्तासंघर्ष यामुळे वातावरण तापले आहे. येत्या काही दिवसांत निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर ही राजकीय चढाओढ आणखी तीव्र होणार असून, तळेगाव गटातील लढत जिल्ह्यातील सर्वात चुरशीच्या लढतींपैकी एक ठरण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

### मागील निवडणुकीची जखम अजून ताजी

● मागील पंचवार्षिक निवडणुकीत जिल्हा परिषद व दोन्ही पंचायत समिती सदस्य अपक्ष निवडून येणे, ही घटना आजही राजकीय पक्षांसाठी चिंतेची बाब आहे. उमेदवारीवरून झालेली गटबाजी आणि समन्वयाच्या अभावामुळे पक्षांची ताकद कोलमडली होती. हीच पुनरावृत्ती टाळण्यासाठी यंदा वरिष्ठांकडून प्रयत्न सुरू असले, तरी स्थानिक पातळीवरील असंतोष अजूनही कायम आहे.

## तपपूर्ती वर्षानिमित्त पिंपळेश्वर कावड सोहळ्याचे जल्लोषात स्वागत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ चौदानंबर येथे फटाक्यांची आतषबाजी, कावड पूजन व भाविकांचा सन्मान

**पिंपळवंडी :** श्री क्षेत्र पिंपळवंडी ते श्री क्षेत्र भीमाशंकर या पिंपळेश्वर कावड सोहळ्याचे चौदानंबर येथे श्री स्वामी व्यापारी बचत गटाच्या वतीने उत्साहात स्वागत करण्यात आले. या कावड सोहळ्याचे यंदाचे वर्ष हे तपपूर्ती वर्ष असल्याने स्वागताचा सोहळा विशेष उत्साहात व भक्तिभावाच्या वातावरणात पार पडला.

श्री स्वामी व्यापारी बचत गटाच्या वतीने गेल्या बावीस वर्षांपासून आळंदी तसेच विविध धार्मिक ठिकाणी जाणाऱ्या वारकऱ्यांना अन्नदान व आवश्यक सुविधा पुरविल्या जात आहेत. त्याच परंपरेनुसार, पिंपळवंडी येथील पिंपळेश्वर सेवा समितीच्या वतीने गेल्या अकरा वर्षांपासून सुरू असलेल्या या कावड सोहळ्याचे शनिवारी (दि. १०) चौदानंबर येथे आगमन झाले. तपपूर्ती वर्षानिमित्त फटाक्यांची आतषबाजी करत कावड सोहळ्याचे स्वागत करण्यात आले. यावेळी विधीवत कावड पूजन करण्यात आले तसेच कावड सोहळ्यात सहभागी भाविक व उपस्थित मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

या स्वागत सोहळ्यास बाजार समितीचे सभापती रघुनाथ लेंडे, तालुकाप्रमुख माऊली खंडागळे, उपतालुकाप्रमुख मंगेश आणा काकडे, सरपंच मेघाताई काकडे, ग्रामपंचायत सदस्य सतीश काकडे, ऋषिकेश भोर, सामाजिक कार्यकर्ते पी. के. कोकाटे, तंटामुक्ती समितीचे माजी अध्यक्ष तानाजी शेठ वाळुंज, प्रकाशशेठ नेहरकर, माजी चेअरमन संतोषशेठ नेहरकर, माजी सदस्य सत्यवान काकडे, कावड समितीचे अध्यक्ष वसंत वाघ, विकास काकडे, राजू काकडे, सुनील फुलसुंदर आदी मान्यवर उपस्थित होते.

याशिवाय ह. भ. प. रामदास महाराज मोरे, भागुशेठ भोर, संतोष मुळे, मारुती टाकळकर, पोपट बो-हाडे, जगदीश पंडित, अनिल टेंभेकर, विठ्ठल वाळुंज, बाबाजी टाकळकर यांच्यासह अनेक भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## आरपीआयकडून कर्तृत्ववानांचा गौरव

### शौर्यदिनी कोरेगाव भीमा येथे उत्कृष्ट नियोजन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**शिक्रापूर :** कोरेगाव भीमा (ता. शिरूर) येथे १ जानेवारी रोजी साजऱ्या झालेल्या शौर्यदिनाच्या विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याचे उत्कृष्ट नियोजन करून हा कार्यक्रम कोणतेही गालबोट न लागता शांततेत पार पाडल्याबद्दल रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) शिरूर तालुक्याच्या वतीने संबंधित पोलीस अधिकारी, प्रशासकीय अधिकारी तसेच पत्रकारांचा सन्मान करण्यात आला.

शौर्यदिनी विजयस्तंभ अभिवादनासाठी दरवर्षी लाखो अनुयायी कोरेगाव भीमा येथे येतात. काही वर्षांपूर्वी घडलेल्या अनुचित घटनांमुळे या सोहळ्याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले होते. अशा पार्श्वभूमीवर यंदाचा सोहळा शांततामय वातावरणात पार पाडणे हे प्रशासनासाठी मोठे आव्हान होते. तब्बल दहा हजार पोलिसांचा बंदोबस्त तैनात करून अत्यंत काटेकोर नियोजन करण्यात आले. वाहतूक नियंत्रण, जमाव व्यवस्थापन, कायदा व सुव्यवस्था तसेच आपत्कालीन परिस्थितीची तयारी यामुळे संपूर्ण सोहळा शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) शिरूर तालुकाध्यक्ष नवनाथ कांबळे यांच्या पुढाकाराने जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, पोलीस उपायुक्त सोमय्या मुंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले, शिक्रापूरचे पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड, लोणीकंदचे पोलीस निरीक्षक सर्जेराव कुंभार, रांजणगावचे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे तसेच महावितरणचे उपकार्यकारी अभियंता सुजित जाधव यांचा सन्मान करण्यात आला.

याचबरोबर शौर्यदिनी झालेल्या विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याचे वस्तुनिष्ठ व जबाबदारीने वार्तांकन करून समाजात शांततेचा व सौहार्दाचा संदेश देणाऱ्या पत्रकारांचाही यावेळी विशेष सन्मान करण्यात आला. यामध्ये पत्रकार शरद पाबळे,
भरत पचंगे, नागनाथ शिंगाडे, शेरखान शेख, उमेश काळे आणि मयूर भुजबळ यांचा समावेश होता. सर्व सन्मानितांना स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आले. या कार्यक्रमास उद्योजक नवनाथ भुजबळ, राजेंद्र केदारी, उमेश भुजबळ यांच्यासह आरपीआयचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी प्रशासन व पोलिसांच्या कार्यशैलीचे कौतुक केले.

याप्रसंगी बोलताना तालुकाध्यक्ष नवनाथ कांबळे म्हणाले की, "देशाचे लक्ष लागलेल्या या शौर्यदिन सोहळ्याला कोणतेही गालबोट न लागता शांततेत पार पाडणे हे अत्यंत आव्हानात्मक होते.

## प्रसिद्ध ताशा वादक जालिंदर लहू शेवाळे यांना 'साई जीवन गौरव पुरस्कार




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** पारंपरिक लोककलेचा वारसा जपत ताशा वादनाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेला नवी ओळख मिळवून देणारे प्रसिद्ध ताशा वादक जालिंदर लहू शेवाळे यांना शिर्डी येथे भव्य समारंभात "साई जीवन गौरव पुरस्कार" प्रदान करून गौरविण्यात आले. ओम साई विकास प्रतिष्ठान व बी.सी. फिल्म प्रोडक्शन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय पातळीवर हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

शिर्डी येथील साईभक्तांच्या साक्षीने हा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मण कांबळे व सामाजिक कार्यकर्ते शिवशंकर काळे यांच्या शुभहस्ते जालिंदर शेवाळे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कला क्षेत्रातील प्रदीर्घ योगदानाचा गौरव करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

जालिंदर लहू शेवाळे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून ताशा वादनाच्या माध्यमातून गणेशोत्सव, शिवजयंती, सार्वजनिक उत्सव, धार्मिक मिरवणुका तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. पारंपरिक ताशा वादनात नवनवीन प्रयोग करत त्यांनी तरुण पिढीला या लोककलेशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. त्यांच्या ताशा वादनातील शिस्त, तालबद्धता व उत्स्फूर्त ऊर्जा प्रेक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेते.

पुरस्कार स्वीकारताना जालिंदर शेवाळे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, "हा सन्मान माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण आहे. साईबाबांच्या पवित्र भूमीत मिळालेला हा पुरस्कार माझ्यासाठी अत्यंत प्रेरणादायी आहे.

## महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परराज्यातील विदेशी मद्य जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अवैध मद्य वाहतूक व वितरण रोखण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने कडक पावले उचलली आहेत. या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क, जी विभाग, पुणे कार्यालयाने ९ जानेवारी २०२६ रोजी पिंपरी परिसरात धडक कारवाई करत परराज्यातून (दमण) बेकायदेशीररीत्या आणलेले ११२.३२ बल्क लिटर विदेशी मद्य आणि मद्य वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले एक चारचाकी वाहन असा एकूण ७ लाख २० हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई पवनेश्वर मंदिराजवळ करण्यात आली असून या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, तसेच अवैध दारू विक्री व वितरणास आळा घालण्याच्या उद्देशाने राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत पिंपरी येथील पवनेश्वर मंदिर परिसरात सापळा रचून ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी जवान प्रमोद पालवे (जी-१) यांनी फिर्याद दिली असून त्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या कारवाईत राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक संजय कोल्हे, दुय्यम निरीक्षक अभय औटे, गणेश पठारे व ब्रह्मानंद रेडेकर, जवान प्रमोद पालवे, समीर बिरांजे, विजय घंदुरे, अमोल कांबळे यांच्यासह एसएसटी पथक, पी.आय. आणि पिंपरी पोलीस स्टेशनच्या पथकाने संयुक्तरित्या सहभाग घेतला. सदर गुन्ह्याचा पुढील तपास दुय्यम निरीक्षक अभय औटे (जी-१) हे करीत आहेत. दरम्यान, महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या कालावधीत अवैध मद्य वाहतूक, साठवणूक व विक्री तसेच कायदा व सुव्यवस्थेला बाधा पोहोचविणाऱ्या कोणत्याही बेकायदेशीर कृत्यांविरोधात राज्य उत्पादन शुल्क विभागाची कठोर कारवाई यापुढेही सुरू राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. नागरिकांनी अशा प्रकारच्या अवैध बाबींची माहिती तात्काळ संबंधित यंत्रणांना द्यावी व निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण, निर्भय आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कोणत्याही कठीण परिस्थितीत जीवनात हार मानू नका - कैलास दुधाळे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** नारोडी (ता. आंबेगाव) येथील कृषी संचालक स्व. शंकरराव भिमाजी घोडेकर यांच्या बाराव्या पुण्यस्मरणानिमित्त श्री मुक्तादेवी विद्यालय, नारोडी येथे गुरुकुल प्रकल्पांतर्गत बाह्यव्याख्याता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्व. शंकरराव घोडेकर यांचे बंधू डॉ. एकनाथ घोडेकर यांच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमात "हे जीवन सुंदर आहे" या विषयावर राजगुरुनगर येथील माऊली सेवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते कैलास दुधाळे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. जीवनात अनेक अडचणी, अपयश व संकटे येतात; मात्र कोणत्याही कठीण परिस्थितीत हार न मानता सकारात्मक विचारांनी पुढे जात राहिले पाहिजे, असा संदेश त्यांनी दिला. आपल्या सामाजिक कार्यातील अनुभव सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, संयम आणि कष्टाचे महत्त्व पटवून दिले. सकारात्मक दृष्टिकोन ठेवला तर जीवन अधिक सुंदर व अर्थपूर्ण बनते, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी कवी नामदेव हुले यांनी प्रबोधनात्मक काव्यवाचन करून उपस्थितांना विचारप्रवृत्त केले. त्यांच्या कवितांनी विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. कार्यक्रमास ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष सोपानराव हुले, श्री मुक्तादेवी ग्रामविकास संस्थेचे अध्यक्ष दगडू बंगाळ, विविध विकास कार्यकारी सोसायटीचे चेअरमन विलास हुले, स्कूल कमिटी सदस्य नवनाथ हुले, योगशिक्षक शंकर पिंगळे, शंकर हुले, प्रसिद्ध निवेदक सिद्धेश पिंगळे, व्यवस्थापन समिती सदस्य सुभाष हुले, चंद्रकांत खेडकर, मीरा खेडकर, मंदा कानडे यांच्यासह विद्यालयातील शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तुळापूर शाळेत 'ओळख ज्ञानेश्वरीची' उपक्रमातून वारी दर्शनाचे प्रभावी प्रबोधन

### हरीपाठ वाचन, गायन, विवेचनातून विद्यार्थ्यांमध्ये भक्ती-संस्कारांची रुजवण

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**आळंदी :** येथील तुळापूर धर्मवीर संभाजीराजे माध्यमिक विद्यालयात "ओळख ज्ञानेश्वरीची" हा सांस्कृतिक व आध्यात्मिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वपूर्ण असा शालेय मूल्यशिक्षण संवर्धन व संस्कारक्षम उपक्रम उत्साहात राबविण्यात येत आहे. दर शनिवारी आनंददायी व भक्तिभावमय वातावरणात हरीपाठाचे वाचन, सुमधुर गायन तसेच ज्ञानेश्वरीतील ओव्यांचे सविस्तर विवेचन असा भक्ती-ज्ञानमय उपक्रम सातत्याने आयोजित केला जात आहे. या उपक्रमाला तुळापूर गावातील ग्रामस्थ, विद्यार्थी, पालक व शिक्षकवर्ग यांनी एकत्र येत मोठा प्रतिसाद दिला असून उपक्रम यशस्वीपणे स्वीकारला आहे.

या विशेष उपक्रमात शनिवारी (दि. १०) तुळापूर गावाचे मान्यवर पदाधिकारी बापूसाहेब शिवले यांनी हरीपाठाचे सुस्वर वाचन व भक्तिरसपूर्ण गायन केले. त्यांच्या भावपूर्ण स्वरांनी संपूर्ण शाळा परिसर भक्तीभावाने उजळून निघाला आणि उपस्थितांमध्ये आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले.

या उपक्रमाचे खास आकर्षण ठरले ते इयत्ता नववीतील विद्यार्थिनी कु. अमृता बापूसाहेब शिवले हिने सादर केलेले संतवाङ्मयीन विवेचन. ज्ञानेश्वरीतील निवडक ओव्यांचे भावार्थ, त्यामधील तत्त्वज्ञान, आधुनिक जीवनाशी असलेला त्याचा संबंध तसेच संतांचे व्यापक सामाजिक योगदान या सर्व मुद्द्यांची तिने प्रभावी, समर्पक व सुटसुटीत मांडणी केली. तिचे वक्तृत्व, अभ्यासपूर्ण तयारी आणि आत्मविश्वास पाहून उपस्थितांनी तिचे मनापासून कौतुक केले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनात विद्यालयाचे मुख्याध्यापक आबा जाधव यांचा मोलाचा वाटा असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली 'ओळख ज्ञानेश्वरीची' हा उपक्रम सातत्याने व प्रभावीपणे राबविला जात आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संस्कृतीची जाण, वाचनाची आवड आणि मूल्यशिक्षणाची जडणघडण अधिक भक्कम होत असल्याचे त्यांनी सांगितले. संत साहित्याचे सातत्यपूर्ण अध्ययन व मनन विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देणारे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## पाबळ प्रीमियम लीगमध्ये चौधरी पाटील स्पोर्ट्स क्लबचे हॅट्रिक विजेतेपद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पाबळ :** पाबळ येथे ९ ते ११ जानेवारी २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेली "पाबळ प्रीमियम लीग - गाव चॅम्पियन 2025-26" क्रिकेट स्पर्धा मोठ्या उत्साहात आणि खेळाडूवृत्तीच्या वातावरणात पार पडली. श्री भैरवनाथ स्पोर्ट्स क्लब, पाबळ यांच्या वतीने सलग तिसऱ्या वर्षी या स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत पाबळ गावातील सहा वार्ड वाईज संघांनी सहभाग घेतला. फुल पिच क्रिकेट पद्धतीने खेळविण्यात आलेल्या या सामन्यांमध्ये प्रत्येक लढत चुरशीची ठरली. स्थानिक खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रेक्षकांची मने जिंकली. यंदाच्या स्पर्धेत चौधरी पाटील स्पोर्ट्स क्लब संघाने आपले वर्चस्व कायम राखत सलग तिसऱ्या वर्षी विजेतेपद पटकावले. या विजयासह संघाने स्पर्धेच्या इतिहासात नवा विक्रम प्रस्थापित करत "गाव चॅम्पियन" होण्याचा मान मिळवला. सलग तिसऱ्या वर्षी गाव चॅम्पियन स्पर्धेचे यशस्वी आयोजन करून श्री भैरवनाथ स्पोर्ट्स क्लबने पाबळमधील क्रीडा चळवळीला नवे बळ दिले असून आयोजकांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## महिलांचा संतप्त सवाल; अडीच-तीन कोटींचा निधी मंजूर होऊनही दिवसाआड अपुरा पाणीपुरवठा

# अवसरी खुर्दच्या पाणीपुरवठ्याचा सावळा गोंधळ कधी संपणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** अवसरी खुर्द (ता. आंबेगाव) येथील नळ पाणीपुरवठा योजनेचा सावळा गोंधळ कधी संपणार, असा थेट सवाल महिलांनी उपस्थित केला असून ग्रामपंचायतीच्या ढिसाळ नियोजनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला आहे. गावाला दररोज नियमित वेळेत पाणीपुरवठा व्हावा यासाठी माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी गेल्या १५ ते २० वर्षांत अडीच ते तीन कोटी रुपयांचा निधी मंजूर करून दिला आहे. मात्र, वारंवार होणाऱ्या पाईपलाईन लिकेजमुळे नळ पाणीपुरवठा योजनेवर विपरीत परिणाम होत असून नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

मागील चार दिवसांपूर्वी मोरदरा पाझर तलाव ते गावठाणदरम्यान असलेल्या लोखंडी पाईपलाईनला मोठे लिकेज झाले होते. पाईपलाईन दुरुस्तीसाठी तब्बल तीन दिवस लागल्याने गावाला चार दिवसांनी, तेही रविवारी, नळाला पाणी सोडण्यात आले. परिणामी पाणी भरण्यासाठी महिलांची मोठी तारांबळ उडाली. ग्रामपंचायतीने दररोज सकाळी सात ते नऊ या वेळेत नियमित पाणीपुरवठा करावा, अन्यथा येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत त्याचे पडसाद उमटतील, असा इशाराही संतप्त महिलांनी दिला आहे.



अवसरी खुर्द हे आंबेगाव तालुक्यातील तिसऱ्या क्रमांकाचे मोठे गाव आहे. येथे शासकीय तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालय असल्याने राज्यभरातून विद्यार्थी-विद्यार्थिनी शिक्षणासाठी येतात. अनेक विद्यार्थी गावातील खाजगी हॉस्टेलमध्ये वास्तव्यास असल्याने गावाला दररोज मोठ्या प्रमाणात पाण्याची गरज असते. मात्र गेल्या पंधरा वर्षांपासून ग्रामपंचायतीकडून दिवसाआड, तेही अवघ्या अर्धा ते पाऊण तासच पाणी सोडले जाते. त्यामुळे दैनंदिन वापरासाठी लागणारे पाणी अपुरे पडत असून नागरिकांना खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे.

मोरदरा पाझर तलावापासून गावठाणापर्यंत सुमारे दोन किलोमीटर अंतरावर विहीर ते टाकी अशी संपूर्ण लोखंडी पाईपलाईन टाकण्यात आली आहे. मात्र ही पाईपलाईन वारंवार गंजून लिकेज होत असल्याने नळ पाणीपुरवठा विस्कळीत होतो. याचा सर्वाधिक फटका गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबातील महिलांना बसत असून पाण्यासाठी घरात थांबावे लागत असल्याने त्यांचे रोजचे २५० ते ३०० रुपये नुकसान होत आहे.

महिलांनी माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी या प्रश्नात स्वतः लक्ष घालून सरपंच व ग्रामपंचायत प्रशासनाला ठोस सूचना द्याव्यात, अशी मागणी केली आहे.

## संपादकीय

# फोनपेक्षा धोरण महत्त्वाचे

**भारत-अमेरिका संबंध सध्या संवादाच्या पद्धतीवरून नव्हे, तर परस्पर अपेक्षा आणि सन्मानाच्या प्रश्नावरून चर्चेत आहेत. 'फोन झाला नाही,' असे कारणे पुढे करून संबंध ठरवणे ही जुनी मानसिकता असून, बदलत्या जागतिक वास्तवात ती चुकीची ठरते.**

आंतरराष्ट्रीय राजकारणात देशोदेशींचे संबंध हे औपचारिक संवाद, फोन कॉल्स किंवा शिष्टाचारापुरते मर्यादित नसतात. त्यामागे दीर्घकालीन हितसंबंध, सामरिक गरजा, आर्थिक वास्तव आणि परस्पर सन्मान यांची गुंतागुंतीची मांडणी असते. भारत-अमेरिका संबंधांचा सध्याचा टप्पा याच वास्तवाची आठवण करून देणारा आहे. अलीकडेच वॉशिंग्टनकडून व्यक्त झालेल्या अपेक्षा आणि दिल्लीची ठाम भूमिका यांमधून या संबंधांचे स्वरूप अधिक स्पष्ट झाले आहे. अमेरिकेच्या राजकीय व्यवस्थेत सध्या व्यक्तिकेंद्रित राजकारणाचा प्रभाव वाढलेला दिसतो. राष्ट्रप्रमुखांमधील थेट संवाद, व्यक्तिगत जवळीक आणि तत्काळ परिणाम यांवर अधिक भर दिला जात आहे. अशा पार्श्वभूमीवर भारताकडून अपेक्षित असलेला 'वेळीच फोन' न झाल्याने व्यापारविषयक चर्चा अडचणीत आल्या, असा सूर वॉशिंग्टनमधून लावला गेला. मात्र ही मांडणी वास्तवाशी फारकत घेणारी आहे. भारतासारख्या देशाची परराष्ट्रनीती ही कोणत्याही एका व्यक्तीच्या संवादावर अवलंबून नसून, ती संस्थात्मक निर्णयप्रक्रिया, राष्ट्रीय हित आणि दीर्घकालीन धोरणांवर आधारलेली आहे. भारत आज जागतिक पटलावर आत्मविश्वासाने उभा असलेला देश आहे. वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था, मोठी देशांतर्गत बाजारपेठ, तंत्रज्ञान आणि मनुष्यबळ यामुळे भारताचे महत्त्व केवळ प्रादेशिक न राहता जागतिक झाले आहे. त्यामुळे भारताकडे पाहण्याची दृष्टी 'कनिष्ठ भागीदार' अशी असू शकत नाही. भारत अमेरिकेशी सहकार्य करण्यास तयार आहे, पण ते सहकार्य समतेच्या आधारावर आणि परस्पर सन्मानातूनच होऊ शकते. दबाव, धमक्या किंवा वैयक्तिक अपेक्षा यांच्या जोरावर भारत निर्णय घेईल, ही अपेक्षा कालबाह्य ठरते. व्यापार चर्चांचा मुद्दा याचे उत्तम उदाहरण आहे. भारत-अमेरिका व्यापार संबंधांमध्ये संधी तितक्याच आहेत, जितक्या की अडचणी. टॅरिफ, स्थानिक उद्योगांचे संरक्षण, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि बाजारपेठेचा प्रवेश या मुद्द्यांवर दोन्ही देशांची भूमिका वेगवेगळी आहे. हे मतभेद दूर करण्यासाठी सखोल चर्चा, स्थिर धोरणे आणि परस्पर समज आवश्यक असते. एखादा फोन कॉल झाला नाही म्हणून करार रखडतो, ही सोपी मांडणी प्रत्यक्षातील गुंतागुंत दाखवण्यास असमर्थ ठरते. भारताने गेल्या काही वर्षांत परराष्ट्र धोरणात स्वायत्ततेवर विशेष भर दिला आहे. अमेरिका, रशिया, युरोप, आशिया आणि जागतिक दक्षिण या सर्वांशी संतुलित संबंध ठेवण्याचा प्रयत्न भारत करत आहे. ऊर्जा सुरक्षेसाठी रशियाशी संबंध, आशिया-पॅसिफिकमध्ये अमेरिकेसोबत सहकार्य आणि ब्रिक्ससारख्या मंचांवरील सहभाग हे या धोरणाचे भाग आहेत. त्यामुळे कोणत्याही एका देशाच्या अपेक्षांनुसार आपली दिशा बदलणे भारताला शक्य नाही. अमेरिकेच्या दृष्टीनेही भारताचे महत्त्व कमी नाही. चीनच्या वाढत्या प्रभावाला तोल देण्यासाठी, जागतिक पुरवठा साखळी मजबूत करण्यासाठी आणि लोकशाही मूल्यांचा प्रचार करण्यासाठी भारत हा महत्त्वाचा भागीदार ठरतो. मात्र हे भागीदारीचे नाते आदेश आणि अपेक्षांवर नव्हे, तर संवाद आणि विश्वासावर उभे राहायला हवे. भारताला केवळ गरजेच्या वेळी आठवण काढून चालणार नाही, तर सातत्यपूर्ण आणि प्रामाणिक संवादाची गरज आहे, हे अमेरिकेने लक्षात घेणेही तितकेच आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर फोन लावण्याची गरज ही प्रतीकात्मक अर्थाने आहे. हा फोन दबाव टाकण्यासाठी नव्हे, तर समतेच्या पातळीवर चर्चा सुरू ठेवण्यासाठी असावा. भारतही आपल्या राष्ट्रीय हितांशी तडजोड न करता सहकार्याचा हात पुढे करेल, ही अपेक्षा ठेवणे गैर नाही. एकूणच, भारत-अमेरिका संबंध हे व्यक्तींपेक्षा धोरणांवर आणि तात्कालिक अपेक्षांपेक्षा दीर्घकालीन उद्दिष्टांवर आधारित असले पाहिजेत. जागतिक अस्थिरतेच्या काळात या दोन लोकशाही देशांमधील संतुलित आणि परिपक्व भागीदारी ही केवळ त्यांच्या हिताची नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्थैर्यासाठीही आवश्यक आहे. संवाद हवा, पण तो सन्मानाचा; सहकार्य हवे, पण ते समतेचे. हाच या संबंधांचा पाया ठरू शकतो.

# दिल्लीतील प्रदूषण आणि यंत्रणांची जबाबदारी!

**दिल्लीतील वाढते वायू प्रदूषण हे पर्यावरणाचेच नव्हे, तर प्रशासनाच्या कार्यक्षमतेचेही अपयश उघड करणारे ठरते आहे. सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केलेली नाराजी ही एका संस्थेपुरती मर्यादित नसून, संपूर्ण प्रदूषण नियंत्रण यंत्रणेला स्वतःकडे पाहण्याची गरज अधोरेखित करते.**



दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी परिसरातील वायू प्रदूषणाचा प्रश्न आता ऋतुपरत्वे चर्चेत येणारा विषय राहिलेला नाही. तो नागरिकांच्या आरोग्याशी, जगण्याच्या मूलभूत हक्काशी आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेशी थेट जोडलेला गंभीर मुद्दा बनला आहे. अशा पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने वायू प्रदूषणावर नजर ठेवणाऱ्या संस्थेच्या कामगिरीवर व्यक्त केलेली तीव्र नाराजी महत्त्वाची ठरते. ती एका प्रकरणापुरती मर्यादित नसून, संपूर्ण प्रदूषण नियंत्रण व्यवस्थेला दिलेला स्पष्ट इशारा आहे. वायू गुणवत्ता व्यवस्थापन आयोगाची स्थापना मोठ्या अपेक्षांनी करण्यात आली होती. दिल्ली तसेच आजूबाजूच्या राज्यांमधील प्रदूषणावर समन्वयाने आणि वैज्ञानिक पद्धतीने नियंत्रण ठेवावे, हा त्यामागचा उद्देश होता. प्रत्यक्षात मात्र आयोगाची कामगिरी अपेक्षेइतकी प्रभावी ठरलेली नाही, असे न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले. प्रदूषणाचा प्रश्न अनेक वर्षांपासून ज्ञात असतानाही ठोस आणि दीर्घकालीन उपाय पुढे येत नसल्याची बाब गंभीर आहे. दिल्लीतील हवेच्या गुणवत्तेवर अनेक घटकांचा परिणाम होतो. वाहनांमधून होणारे उत्सर्जन, उद्योगांतील धूर, बांधकामातून उडणारी धूळ, कचरा जाळणे आणि शेतातील पिकांचे अवशेष पेटवणे या सगळ्यांचा एकत्रित परिणाम वातावरणावर होतो. कारणे स्पष्ट असतानाही उपाययोजना मात्र दरवर्षी बदलत नाहीत. हिवाळा सुरू झाला की निर्बंध, बंदी आणि आपत्कालीन निर्णयांची मालिका सुरू होते. परिणामी, प्रश्न मूळापासून सुटत नाही आणि पुढील वर्षासाठी ढकलला जातो. न्यायालयाच्या नाराजीमागे हीच सततची टाळाटाळ आहे. आयोगाच्या बैठका नियमितपणे न होणे, निर्णयांवर अंमलबजावणीचा अभाव आणि विविध यंत्रणांमधील समन्वयाची कमतरता या बाबी स्पष्टपणे समोर आल्या. नियम बनवणे किंवा सूचना देणे इतक्यावर जबाबदारी संपत नाही. त्या प्रत्यक्षात कितपत उतरतात, याचे मूल्यमापन करणेही तितकेच आवश्यक आहे, याकडे न्यायालयाने लक्ष वेधले. प्रदूषण नियंत्रणाची जबाबदारी एका संस्थेपुरती मर्यादित नसते. केंद्र आणि राज्य सरकारे, स्थानिक स्वराज्य संस्था, वाहतूक व औद्योगिक विभाग यांचा त्यात सहभाग असतो. मात्र जबाबदारी निश्चित न झाल्याने अनेकदा निर्णय रखडतात. एक विभाग दुसऱ्याकडे बोट दाखवतो आणि समस्या तशीच राहते. प्रशासनातील ही मानसिकता बदलल्याशिवाय परिस्थितीत सुधारणा होणे अवघड आहे. हवेच्या गुणवत्तेचा प्रश्न वैज्ञानिक पद्धतीने हाताळण्याची गरज आहे. प्रदूषणाचे स्रोत, त्यांचा कालानुसार बदलणारा प्रभाव आणि त्यावर उपाय यांचे अचूक विश्लेषण झाल्याशिवाय धोरणे प्रभावी ठरू शकत नाहीत. प्रत्यक्षात आकडेवारी गोळा केली जाते, मात्र तिचा उपयोग ठोस निर्णयांसाठी पुरेशा प्रमाणात होत नाही. अभ्यासावर आधारित धोरणांऐवजी तात्कालिक दबावातून घेतलेले निर्णय अधिक दिसतात. सर्वोच्च न्यायालयाचा हस्तक्षेप म्हणजे प्रशासनाच्या अधिकारात हस्तक्षेप नव्हे, तर त्यांना जबाबदारीची जाणीव करून देण्याचा प्रयत्न आहे. लोकांचे आरोग्य, मुलांचे भविष्य आणि शहरांचे राहणीमान या सगळ्यांशी संबंधित प्रश्नावर हलगर्जीपणा परवडणारा नाही, हा स्पष्ट संदेश यातून दिला गेला आहे. वायू प्रदूषणाची समस्या दिल्लीपुरती मर्यादित नाही. देशातील अनेक मोठ्या शहरांमध्ये परिस्थिती हळूहळू गंभीर बनत आहे. त्यामुळे राजधानीतील अनुभव इतर शहरांसाठी इशारा मानावा लागेल. नियमन करणाऱ्या संस्था प्रभावीपणे काम करत नसतील, तर भविष्यात अडचणी अधिक वाढण्याची शक्यता आहे. एकूणच, सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केलेली नाराजी प्रदूषण नियंत्रण यंत्रणेसाठी जागृतीचा क्षण आहे. संस्था निव्वळ कागदोपत्री अस्तित्वात असून चालणार नाहीत, तर त्यांचा उद्देश प्रत्यक्षात साध्य झालेला दिसला पाहिजे. तात्पुरत्या उपायांऐवजी दीर्घकालीन, वैज्ञानिक आणि समन्वयित धोरणांची गरज आहे. अन्यथा दरवर्षी धुरात गुदमरलेली शहरे आणि निष्क्रिय प्रशासन, अशीच परिस्थिती कायम राहील.

# निवडणुकीतील सर्वांत महत्त्वाचे कर्तव्य म्हणजे मतदान

## निवडणूक निरीक्षक सरिता नरके; महापालिकेची व्हिंटेज कार रॅली; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** लोकशाही अधिक मजबूत करण्यासाठी प्रत्येक सुजाण नागरिकाने मतदान करणे अत्यावश्यक आहे. मतदान हा केवळ अधिकार नसून ते प्रत्येक मतदाराचे सर्वांत महत्त्वाचे कर्तव्य आहे, असे ठाम प्रतिपादन निवडणूक निरीक्षक सरिता नरके यांनी केले. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मतदान जनजागृतीसाठीच्या व्हिंटेज कार रॅलीच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

नरके म्हणाल्या की, राज्य शासनाने १५ जानेवारी रोजी निवडणुकीसाठी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. या दिवशी प्रत्येक मतदाराने कोणताही आळस न करता सकाळी मतदान केंद्रावर जाऊन आपला मतदानाचा हक्क बजावावा. आपले मत हीच लोकशाहीची खरी ताकद असून, जबाबदार नागरिक म्हणून मतदान करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. महानगरपालिकेच्या 'स्वीप' उपक्रमांतर्गत मतदान जनजागृतीसाठी लिनिअर गार्डन (कोकण चौक), पिंपळे सौदागर येथून नियोजित महापौर निवास मैदान, निगडीपर्यंत व्हिंटेज कार रॅली काढण्यात आली. या रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाला महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, मतदार जनजागृतीसाठीच्या ब्रँड ॲम्बेसिडर व प्रसिद्ध अभिनेत्री श्रेया बुगडे, उपायुक्त अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता हरविंदर सिंग बन्सल, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच क्लासिक कार क्लबचे अध्यक्ष अनंत भुकेले पाटील उपस्थित होते.

अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी सांगितले की, महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत. नागरिकांनी कोणत्याही दबावाला किंवा प्रलोभनाला बळी न पडता निर्भयपणे मतदान करावे व लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रसिद्ध अभिनेत्री श्रेया बुगडे म्हणाल्या की, पिंपरी-चिंचवडमधील नागरिक सुज्ञ व जागरूक आहेत. त्यामुळे १५ जानेवारी रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मोठ्या संख्येने मतदार मतदानासाठी बाहेर पडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### अनोख्या व्हिंटेज गाड्यांचे आकर्षण

● १९३५ पासूनच्या विविध प्रकारच्या व्हिंटेज कार्स आणि दुचाकींनी या रॅलीत विशेष आकर्षण निर्माण केले. यामध्ये फोर्ड, प्रिमियर पद्मिनी, मर्सिडीज, मिली सिटॅाप, ११८ एन.ई., सिलेक्ट, प्रेसिडेंट तसेच दुसऱ्या महायुद्धातील जीप यांचा समावेश होता. दुचाकींमध्ये लॅब्रेटा, विजया सुपर, राजदूत, येझदी, व्हेस्पा, बजाज सुपर आदी गाड्यांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. अनंत भुकेले पाटील यांनी उपस्थितांना या गाड्यांचा इतिहास समजावून सांगितला.

# पिंपरी-चिंचवडचा कायापालट करणार; विकासाचा ब्लूप्रिंट सादर

## उपमुख्यमंत्री अजित पवारांची ग्वाही



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर शहरात प्रचाराची रणधुमाळी सुरू असताना, आज पिंपरी येथील वल्लभनगरमधील कलासागर हॉटेलमध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पत्रकार परिषदेत पिंपरी-चिंचवड शहरासाठीचे विकासदृष्टीपत्र जाहीर केले. यावेळी बोलताना अजित पवार यांनी ठामपणे सांगितले की, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येऊन पिंपरी-चिंचवडचा कायापालट करून दाखवतील. याआधीही या शहराचा विकास आम्हीच केला असून, पुढील काळात विकासाची गती अधिक वाढवली जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अजित पवार म्हणाले की, पिंपरी-चिंचवडकरांसाठी मेट्रो आणि पीएमपीएमएल बस सेवा मोफत करण्याचे वचन आम्ही देत आहोत. यामुळे सामान्य नागरिक, विद्यार्थी, कामगार आणि ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. आरोग्य सुविधांबाबत बोलताना अजित पवार यांनी सांगितले की, वायसीएम रुग्णालयाच्या शेजारी अत्याधुनिक सुविधा असलेले, सुमारे दहा मजली भव्य रुग्णालय उभारण्यात येईल. या रुग्णालयात अत्यावश्यक हायटेक मशिनरी, आधुनिक उपचार सुविधा आणि तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध असतील, जेणेकरून पिंपरी-चिंचवडकरांना दर्जेदार आरोग्यसेवा शहरातच मिळू शकेल. पत्रकार परिषदेला उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह आमदार अण्णा बनसोडे, आमदार रोहित पवार, खासदार डॉ. अमोल कोल्हे, राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष योगेश बहल, आमदार विलास लांडे, गोरख लोखंडे, अजित गव्हाणे, माजी शहराध्यक्ष तुषार कामठे तसेच पिंपरी-चिंचवड शहरातील विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भोसरीचा विकास वेगाने पुढे नेण्यासाठी भाजपला संधी द्या - ॲड. नितीन लांडगे

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** भोसरी परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी मागील दहा वर्षांत ऐतिहासिक कामे करण्यात आली असून, उर्वरित विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी पुन्हा एकदा भाजपच्या संपूर्ण पॅनेलला बहुमताने विजयी करा, असे आवाहन पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीचे माजी अध्यक्ष व भोसरी गावठाण, प्रभाग क्रमांक ७ मधील भाजपचे अधिकृत उमेदवार ॲड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांनी केले.

पिंपरी येथे शनिवारी (दि. ११ जानेवारी २०२६) प्रभाग क्रमांक ७ मधील भाजपच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारासाठी विविध भागांत पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेत संतोष ज्ञानेश्वर लोंढे (अ), प्रा. सोनाली दत्तात्रय गव्हाणे (ब), राणीमाई अशोक पठारे (क) आणि ॲड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे (ड) सहभागी झाले होते. विकास कॉलनी, खंडोबा माळ, दिघी रोड, सँडविक कॉलनी, आपटे कॉलनी, शितल बाग आदी परिसरांतून ही पदयात्रा काढून मतदारांशी थेट संपर्क साधण्यात आला. यावेळी बोलताना ॲड. नितीन लांडगे म्हणाले की, आमदार महेश दादा लांडगे यांच्या नेतृत्वाखाली 'व्हिजन २०२५' मध्ये नमूद केलेली बहुतांश विकासकामे पूर्ण करण्यात आली आहेत, तर काही महत्त्वाचे प्रकल्प अंतिम टप्प्यात असून लवकरच नागरिकांच्या सेवेत दाखल होतील. गेल्या पन्नास वर्षांत जे काम झाले नाही, ते मागील दहा वर्षांत करून दाखवण्यात आले आहे.

# "जय जवान, जय किसान"चे प्रणेते लाल बहादूर शास्त्री हे थोर स्वातंत्र्यसैनिक

## उप आयुक्त अण्णा बोदडे; महापालिकेत भारतरत्न लाल बहादूर शास्त्री यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** "जय जवान, जय किसान" ही क्रांतिकारी घोषणा देत देशाच्या जवानांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणारे तसेच शेतकऱ्यांना बळ देणारे माजी पंतप्रधान भारतरत्न लाल बहादूर शास्त्री हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील थोर स्वातंत्र्यसैनिक होते, असे प्रतिपादन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे उप आयुक्त अण्णा बोदडे यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये माजी पंतप्रधान भारतरत्न लाल बहादूर शास्त्री यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस उप आयुक्त अण्णा बोदडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ते मार्गदर्शन करताना बोलत होते.

या कार्यक्रमास महापालिकेचे जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी शास्त्रीजींच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्यांच्या कार्याला आदरांजली वाहिली.

उप आयुक्त अण्णा बोदडे पुढे म्हणाले की, लाल बहादूर शास्त्री यांचे संपूर्ण आयुष्य साधेपणा, प्रामाणिकपणा आणि देशसेवेला समर्पित होते. अत्यंत साधे राहणीमान असूनही त्यांनी आपल्या कार्यातून देशासाठी मोठे योगदान दिले. देशाच्या स्वातंत्र्यानंतरच्या कठीण काळात त्यांनी घेतलेले निर्णय आजही प्रेरणादायी आहेत.

शास्त्रीजींनी देशाच्या संरक्षणासाठी जवानांना बळ दिले, तर "जय जवान, जय किसान" या घोषणेद्वारे शेतकऱ्यांच्या महत्त्वावर शिक्कामोर्तब केले. त्यांची नम्रता, दृढ विश्वास, स्पष्ट विचारसरणी आणि कठोर निर्णयक्षमता यामुळे ते जनमानसात अत्यंत लोकप्रिय झाले, असेही बोदडे यांनी सांगितले.आजच्या पिढीने शास्त्रीजींच्या जीवनातून साधेपणा, कर्तव्यनिष्ठा आणि देशसेवेचा आदर्श घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. अशा महान नेत्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रम शांत आणि सन्मानपूर्ण वातावरणात पार पडला.

# निळी-लाल पूररेषेचा कायमस्वरूपी तोडगा; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## फेरसर्वेक्षण करून नव्याने आखणी होणार; कोल्हापूरच्या धर्तीवर 'फ्लड मेटिगेशन मेजर्स'नुसार नवा युनिफाईड डीसीपीआर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवडसह संपूर्ण महाराष्ट्रातील निळी आणि लाल पूररेषा फेरसर्वेक्षण करून नव्याने आखण्यात येणार असून, कोल्हापूरच्या धर्तीवर 'फ्लड मेटिगेशन मेजर्स'नुसार नवा युनिफाईड डीसीपीआर (UDCPR) तयार केला जाणार आहे, अशी मोठी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. आकुर्डी येथील विठ्ठल मंदिर परिसरात आयोजित प्रचारसभेत ते बोलत होते. या निर्णयामुळे पूररेषेमुळे अडकलेल्या विकासकामांना आणि नागरिकांच्या अडचणींना दिलासा मिळणार आहे.

या सभेला भाजप व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट)चे अधिकृत उमेदवार, आमदार शंकर जगताप, आमदार महेश लांडगे, विधानपरिषद आमदार अमित गोरखे, उमा खापरे तसेच शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे उपस्थित होते. आमदार शंकर जगताप यांनी पूररेषेचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात ठोस भूमिका मांडली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, निळी आणि लाल पूररेषेचा प्रश्न युनिफाईड डीसीपीआरमधील काही तरतुदींमुळे निर्माण झाला आहे. या रेषा शंभर वर्षांपूर्वीच्या गृहितकांवर आधारित असल्याने नदीकाठच्या अनेक भागांत विकास थांबला आहे. नागरिकांकडून सातत्याने तक्रारी येत असल्याने हा प्रश्न कायमचा सोडवण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

कोल्हापूरमध्ये पूररेषेसंदर्भात नव्याने डीसीपीआर तयार करून पूरस्थिती उद्भवल्यास कोणत्या प्रकारचे बांधकाम असावे, याचे स्पष्ट नियम करण्यात आले. हे नियम लोकांनी स्वीकारले असून, त्या धर्तीवरच पिंपरी-चिंचवडसाठीही नवा आराखडा तयार केला जाईल, असे मुख्यमंत्री म्हणाले. यासाठी सॅटेलाइट इमेज, जीआयएस स्पेशल डेटा आणि 'फ्लड मेटिगेशन सिस्टिम'चा वापर केला जाणार असून, युनिफाईड डीसीपीआरमध्ये आवश्यक बदल करण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी त्यांनी पवना, मुळा आणि इंद्रायणी नद्यांच्या संवर्धनासाठी २३०० कोटींचा प्रकल्प तयार करण्यात आल्याचे सांगितले. तसेच, शहराचा साडेबारा टक्के परताव्याचा रखडलेला प्रश्न सोडवण्यात आल्याचा उल्लेख केला. लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप व आमदार महेश लांडगे यांच्या मागणीनुसार शास्तीकर पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. प्रॉपर्टी कार्डचा प्रश्न प्राधान्याने सोडवला जाईल, मेट्रोचे मोठ्या प्रमाणात विस्तारीकरण होणार असून तिसरी मेट्रो पिंपरी-चिंचवडला देण्यात येईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले. एलिव्हेटेड कॉरिडॉर, उड्डाणपूल व अंडरपासद्वारे वाहतूक सुलभ केली जात असून, जीसीसी हबमुळे पिंपरी-चिंचवड विकासाच्या केंद्रस्थानी येणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# ठेवीदारांची कोट्यवधींची फसवणूक करणारे परदेशातून परतताना अटकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** शेअर बाजारातील गुंतवणुकीत दरमहा आठ टक्के परताव्याचे आमिष दाखवून पुण्यातील ठेवीदारांची तब्बल २ कोटी ३८ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक करून परदेशात पसार झालेल्या ट्रेडज इन्व्हेस्टमेंट प्रा. लि. कंपनीच्या संचालकांना पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने हैद्राबाद विमानतळावर अटक केली. सचिन खडतरे (रा. करकंब, पंढरपूर, जि. सोलापूर) आणि प्रसाद कुलकर्णी (वय ३६, रा. सारंग सोसायटी, नांदेड सिटी, पुणे) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

आरोपींनी शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास मोठा व हमखास परतावा मिळेल, असे भासवून अनेक गुंतवणूकदारांकडून कोट्यवधी रुपये उकळले. कंपनीच्या संकेतस्थळावर बनावट नोंदी दाखवून ठेवीदारांना परतावा मिळाल्याचा आभास निर्माण करण्यात आला. प्रत्यक्षात मात्र कोणताही परतावा देण्यात आला नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर ठेवीदारांनी तक्रार दाखल केली, त्यानुसार आठ जणांविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला होता.

आरोपी परदेशात पसार होण्याची शक्यता लक्षात घेऊन आर्थिक गुन्हे शाखेने 'लूक आऊट नोटीस' जारी केली होती. दरम्यान, ३० डिसेंबर रोजी आरोपी शारजाहून हैद्राबादला विमानाने येत असल्याची माहिती मिळताच आर्थिक गुन्हे शाखेचे पथक हैद्राबादला रवाना झाले. ही कारवाई अतिरिक्त पोलीस आयुक्त पंकज देशमुख, उपायुक्त विवेक मासाळ, सहाय्यक आयुक्त शुभदा संखे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष खेतमाळस, सहायक निरीक्षक चेतन मोरे, राजेश लांघी, विनोद चव्हाण व मुसळे यांच्या पथकाने केली. अटक केलेल्या आरोपींना पुण्यातील विशेष न्यायालयात हजर करण्यात आले आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### हैदराबाद-विजयवाडा मार्गावर मोठी वाहतूक

**अमरावती :** संक्रांतीच्या सणापूर्वी मोठ्या संख्येने लोक आंध्र प्रदेशातील त्यांच्या मूळ गावी प्रवास करत असल्याने हैदराबाद-विजयवाडा राष्ट्रीय महामार्गावर रविवारीही मोठी वाहतूक कोंडी झाली. आंध्र प्रदेशातील हा सण तीन दिवसांच्या उत्सवाने साजरा केला जातो - भोगी, मकर संक्रांती आणि कनुमा, जे तेलुगू भाषिक राज्याच्या सांस्कृतिक परंपरांचे प्रतिबिंब आहे. "शनिवारी तेलंगणातील पंथांगी टोल प्लाझावरून ७२,००० वाहने गेली आणि गेल्या २४ तासांत विजयवाडाजवळील कीसेरा टोल प्लाझावरून सुमारे ५५,००० वाहने गेली, त्यामुळे दिवसा गर्दी आणखी वाढण्याची शक्यता आहे," असे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्याने सांगितले.

### तुर्कमान गेट हिंसाचार; आणखी दोघांना अटक

**नवी दिल्ली :** तुर्कमान गेटवर झालेल्या दगडफेकीप्रकरणी दिल्ली पोलिसांनी आणखी दोघांना अटक केली, त्यामुळे या प्रकरणात अटक झालेल्यांची एकूण संख्या १८ झाली आहे, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. तुर्कमान गेट परिसरातील संवेदनशील भागात कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस आणि निमलष्करी दलाचे जवान तैनात आहेत, असेही पोलिसांनी नमूद केले.

### शुभेंदू अधिकारी यांच्यावरील हल्ल्याचा भाजपकडून निषेध

**कोलकाता :** तृणमूल काँग्रेसच्या समर्थकांनी कथितपणे विरोधी पक्षनेते शुभेंदू अधिकारी यांच्यावर हल्ला केल्यानंतर, रविवारी भाजप कार्यकर्त्यांनी पश्चिम बंगालमध्ये विविध ठिकाणी निदर्शने केली. भाजप नेत्याचे वाहन पेटवून त्यांची हत्या करण्याचा कट रचल्याचा आरोप करत निदर्शकांनी या घटनेत सहभागी असलेल्यांना तात्काळ अटक करण्याची मागणी केली. भाजप समर्थकांनी मेदिनीपूर शहर आणि बांकुरा येथील सोनामुखी येथे निदर्शने केली, जिथे रस्ते रोखले आणि टायर जाळले.

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन
# सोमनाथ हे हजार वर्षांच्या संघर्षाचे प्रतिक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमनाथमध्ये आयोजित स्वाभिमान पर्वात बोलताना सांगितले की, स्वातंत्र्यानंतरही गुजरातमधील सोमनाथ मंदिराच्या पुनर्बांधणीला विरोध करणाऱ्या शक्ती आजही सक्रिय आहेत. अशा शक्तींना पराभूत करण्यासाठी भारताला सतर्क, एकजूट आणि शक्तिशाली राहण्याची गरज आहे. १०२६ मध्ये गझनीचे महमूद यांनी सोमनाथ मंदिरावर केलेल्या आक्रमणाच्या १००० वर्षानिमित्त त्यांनी हे विचार मांडले.

मोदी म्हणाले की सोमनाथचा इतिहास विनाश आणि पराभवाचा नव्हे, तर विजय आणि नूतनीकरणाचा आहे. कट्टरपंथी आक्रमक आता इतिहासात मर्यादित झाले असले तरी सोमनाथ मंदिर आजही उंच उभे आहे, हे श्रद्धा, लवचिकता आणि राष्ट्रीय अभिमानाचे प्रतीक आहे. शतकानुशतके झालेल्या विध्वंसाच्या अनेक प्रयत्नांनंतरही सामूहिक संकल्प आणि प्रयत्नांनी या मंदिराचा प्राचीन वैभव पुन्हा उभा राहिला आहे.


पंतप्रधानांनी म्हटले की, द्वेष, अत्याचार आणि दहशतीचा खरा इतिहास आपल्यापासून लपवण्यात आला होता. लोकांना शिकवण्यात आले की हा हल्ला मंदिर लुटण्याचा प्रयत्न होता. जेव्हा सरदार वल्लभभाई पटेल यांनी सोमनाथ मंदिराच्या पुनर्बांधणीची शपथ घेतली, तेव्हा त्यांना अडथळ्यांचा सामना करावा लागला. तुष्टीकरणात सहभागी असलेल्या अतिरेकी मानसिकतेच्या लोकांमुळे मंदिराच्या पुनर्बांधणीवर प्रश्न निर्माण झाले, असे ते म्हणाले.

अशा शक्तींना पराभूत करण्यासाठी आपल्याला सतर्क, एकजूट आणि शक्तिशाली राहणे गरजेचे आहे." सोमनाथची कहाणी ही केवळ एका मंदिराची नव्हे, तर संपूर्ण भारताची कहाणी आहे. परदेशी आक्रमकांनी अनेक वेळा भारताचा नाश करण्याचा प्रयत्न केला, मात्र १००० वर्षांनंतरही सोमनाथचा ध्वज उंच फडकत आहे, हे त्यांनी नमूद केले.

या ऐतिहासिक संघर्षाची तुलना जगाच्या इतिहासात दुर्लक्षित राहिली. १००० वर्षांपूर्वीची घटना फक्त मंदिराचा विनाश नव्हे, तर भारतीय संस्कृती, श्रद्धा आणि राष्ट्रीय एकतेवर झालेल्या धाडसी हल्ल्याचे प्रतीक आहे. तरीही भारतीय समाजाने सामूहिक प्रयत्नांनी आणि लढाऊ वृत्तीने मंदिराचे वैभव परत मिळवले, असे ते म्हणाले.

सोमनाथ मंदिराचा इतिहास आणि त्याच्या पुनर्बांधणीतील संघर्ष भारतीयांच्या आत्मविश्वासाचे प्रतीक आहे. मंदिर फक्त धार्मिक स्थळ नसून, राष्ट्रीय एकतेची आणि संस्कृतीच्या टिकावाची खरी चिन्हे दर्शवते. मोदींच्या भाषणातून स्पष्ट झाले की, इतिहासाच्या या शहाण्या धड्याला वर्तमान काळात लक्षात ठेवणे गरजेचे आहे. राष्ट्रासाठी सतर्क राहणे, कट्टरपंथी मानसिकतेला पराभूत करणे आणि एकजूट राखणे हेच आजच्या काळात भारतीयांचा ध्यास असावा. सोमनाथ मंदिर हे विजय, लवचिकता आणि भारतीय श्रद्धेचे प्रतीक म्हणून आजही उभे आहे. इतिहासातून शिकणे, आक्रमकांच्या धोरणांना समजून घेणे आणि राष्ट्रीय अभिमान टिकवणे हे या मंदिराच्या वारशाचे खरी अर्थाने पालन करण्याचे माध्यम आहे, असेही ते म्हणाले.

# अमेरिकी सर्जियो गोर राजधानी दिल्लीत दाखल



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारत-अमेरिका संबंधांमध्ये तणावाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे नियुक्त राजदूत सर्जियो गोर शुक्रवारी रात्री नवी दिल्लीत पोहोचले. नोव्हेंबरच्या मध्यात राजदूत म्हणून नियुक्त झालेल्या गोर यांनी सोशल मीडियावर आपल्या आगमनाचे स्वागत करत म्हटले: "भारत परत येऊन खूप आनंद झाला! आपल्या दोन्ही राष्ट्रांसाठी पुढे अविश्वसनीय संधी आहेत!"

गोर यांचे आगमन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना न बोलवल्यामुळे गेल्या वर्षी स्थगित झालेल्या व्यापार कराराच्या पार्श्वभूमीवर झाले आहे. अमेरिकेचे वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक यांनी यासंदर्भात भारतावर टीका केली होती, तर नवी दिल्लीने हा दावा "चुकीचा" असल्याचे सांगितले. दोन्ही देशांमध्ये भारतावर शुल्क वाढवण्याचा ट्रम्पचा निर्णय, रशियन तेलावर २५% अतिरिक्त शुल्क आणि अमेरिकेच्या इमिग्रेशन व व्हिसा नियमांमध्ये बदल यावरही मतभेद आहेत.

ऑगस्टमध्ये ट्रम्प यांनी गोर यांना भारतातील अमेरिकन राजदूत म्हणून नामांकित केले. ऑक्टोबरमध्ये सिनेटने त्यांना मान्यता दिली.

गोर यांनी ट्रम्पच्या अध्यक्षीय मोहिमेत मोठी भूमिका बजावली होती. राजदूत म्हणून नियुक्त झाल्यानंतर गोर यांचा ऑक्टोबरमध्ये भारत दौरा झाला होता, त्यावेळी त्यांनी पंतप्रधान मोदी आणि परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांची भेट घेतली होती.

# द्रमुकला विधानसभेत २०० पेक्षा जास्त जागा
### तामिळनाडूच्या मुख्यमंत्री स्टॅलिन यांना विश्वास

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई :** आगामी विधानसभा निवडणुकीत दणदणीत विजय मिळवण्यास आणि शक्यतो २०० हून अधिक जागा जिंकण्यास आत्मविश्वासाने सज्ज आहे. पक्षाने गेल्या साडेचार वर्षांत केलेले व्यापक संघटनात्मक कार्य आणि प्रशासकीय कामगिरी उल्लेखनीय असल्याने आम्हाला विजय मिळण्यात काही अडचण येईल, असे वाटत नाही, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी केले आहे.

कोलथूर येथील अनिता अचिव्हर्स अकादमीने आयोजित केलेल्या पोंगल सोहळ्यात बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, भाजपसह विरोधी पक्षांचे नेते आणि कार्यकर्त्यांनीही द्रमुकची संघटनात्मक ताकद आणि कार्यशैली मान्य केली आहे. द्रमुक कार्यकर्त्यांचे प्रयत्न केवळ कोलथूरपुरते मर्यादित नाहीत, तर ते तामिळनाडूमध्ये पसरलेले आहेत. आमची आघाडी किमान २०० जागा जिंकेल. पण तुम्ही आतापर्यंत केलेले काम पाहता, मला खात्री आहे की आम्ही हा आकडा पार करू.

स्टॅलिन म्हणाले की, द्रविड मॉडेल सरकारने मे २०२१ मध्ये सत्तेवर आल्यापासून अनेक कल्याणकारी योजना लागू केल्या आहेत आणि महत्त्वपूर्ण टप्पे गाठले आहेत. आमची कामगिरी तुम्हाला सांगण्याची गरज नाही. पण ती लोकांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी तुमची आहे, असे त्यांनी द्रमुक कार्यकर्ते आणि समर्थकांना सांगितले. पोंगल कार्यक्रम पक्ष कार्यकर्त्यांना ऊर्जा देण्यासाठी आणि प्रेरित करण्यासाठी आयोजित करण्यात आला होता. द्रमुकने निवडणुकीसाठी आवश्यक असलेले जवळपास ५०% काम आधीच पूर्ण केले आहे आणि उर्वरित अर्धे काम येत्या काही महिन्यांत पूर्ण केले जाईल, असे त्यांनी सांगितले.

# उत्तर भारतात थंडीचा कडाका कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** उत्तर भारतात थंडीचा कडाका कायम आहे. राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्ली, हिमाचल प्रदेश, उत्तराखंडमध्ये १२ आणि १३ जानेवारी रोजी थंडीचा इशारा जारी करण्यात आला आहे. त्यानंतर १४ जानेवारी रोजीही काही भागात थंडीचा इशारा कायम राहील.

पुढील पाच दिवसांत, उत्तर पश्चिम भारत आणि बिहारमध्ये सकाळी दाट धुके राहणार आहे. याशिवाय, ११-१६ जानेवारी दरम्यान बिहारच्या काही भागात उत्तर राजस्थानमध्ये थंडीचा इशारा जारी करण्यात आला आहे.

गेल्या २४ तासांच्या हवामानाबद्दल बोलायचे झाले तर, जम्मू-काश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेशातील काही ठिकाणी, उत्तराखंडमधील वेगवेगळ्या ठिकाणी, पंजाब, हरियाणा, चंदीगड, दिल्ली, उत्तर राजस्थानमधील काही ठिकाणी किमान तापमान शून्य अंशांपेक्षा कमी होते. पारा एक ते पाच अंश सेल्सिअस होता. १३ जानेवारीपर्यंत सकाळी उत्तर प्रदेशातील काही भागात खूप दाट धुके दिसून येईल. १२ जानेवारीपर्यंत सकाळी बिहारमध्ये खूप दाट धुके राहण्याची शक्यता आहे. १६ तारखेपर्यंत जम्मू विभाग, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, पंजाबमध्ये, १७ तारखेपर्यंत हरियाणा, चंदीगड, दिल्लीमध्ये, १३ तारखेपर्यंत पश्चिम राजस्थानमध्ये, १४ तारखेपर्यंत पूर्व राजस्थान आणि उप-हिमालयीन पश्चिम बंगाल, सिक्कीममध्ये दाट धुके राहण्याची शक्यता आहे.

रविवारी अधिकाऱ्यांनी सांगितले की, काश्मीरमध्ये थंडीची लाट तीव्र झाली असून किमान तापमान गोठणबिंदूच्या खाली अनेक अंशांनी खाली आले आहे. तापमान शून्यापेक्षा खाली गेल्याने आणि आकाश निरभ्र राहिल्याने दाल सरोवर आणि इतर जलसाठ्यांचे काही भाग गोठले आहेत. शनिवारी रात्री श्रीनगरमध्ये किमान तापमान उणे ५.२ अंश सेल्सिअस नोंदवले गेले, जे मागील रात्रीच्या उणे ५.७ अंश सेल्सिअसपेक्षा थोडे जास्त आहे. जम्मू आणि काश्मीरची उन्हाळी राजधानी गुरुवारी हंगामातील सर्वात थंड रात्रीची नोंद झाली, किमान तापमान उणे ६ अंश सेल्सिअसपर्यंत घसरले. दक्षिण काश्मीरमधील शोपियान हे खोऱ्यातील सर्वात थंड ठिकाण होते, किमान तापमान उणे ८.६ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. पहलगाममध्ये किमान तापमान उणे ७.६ अंश सेल्सिअस नोंदवले गेले.

# एक्सची आक्षेपार्ह मजकुरावर कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अश्लील मजकुराबाबत भारत सरकारने दिलेल्या निर्देशानंतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सने मोठी कारवाई करत ३,५०० पोस्ट हटवल्या असून ६०० अकाउंट डिलीट केली आहेत, अशी माहिती सरकारी सूत्रांनी दिली. पूर्वी ट्विटर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या प्लॅटफॉर्मने नियमांचे पालन करण्याचे आश्वासन दिले असल्याचेही सूत्रांनी स्पष्ट केले.

सूत्रांच्या माहितीनुसार, एक्सने अधिकाऱ्यांना कळवले आहे की पुढे अशा प्रकारच्या सामग्रीला व्यासपीठावर परवानगी दिली जाणार नाही. भारतीय कायद्यांचे उल्लंघन झाल्याची चूक मान्य करत, भविष्यात अश्लील प्रतिमा किंवा मजकुराचा प्रसार रोखण्यासाठी कठोर उपाययोजना केल्या जातील, असेही कंपनीने सांगितले आहे.

इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने एक्सवरील अश्लील सामग्री ध्वजांकित केल्यानंतर आणि कंपनीला ७२ तासांत कारवाई अहवाल सादर करण्याचे निर्देश दिल्यानंतर सुमारे एका आठवड्यात ही पावले उचलण्यात आली. मंत्रालयाने विशेषतः एक्सवरील एआय सेवा, जसे की ग्रॉक एआय, यांचा गैरवापर करून महिलांच्या अश्लील प्रतिमा आणि व्हिडिओ तयार केले जात असल्याचा किंवा शेअर केला जात असल्याचा उल्लेख केला होता. सरकारने स्पष्ट इशारा दिला होता की निर्देशांचे पालन न झाल्यास माहिती तंत्रज्ञान कायदा, भारतीय न्याय संहिता, महिलांचे अश्लील प्रतिनिधित्व प्रतिबंधक कायदा आणि लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायदा यांनुसार कठोर कारवाई केली जाऊ शकते. एक्सला एआय-निर्मित सामग्रीच्या गैरवापराला आळा घालण्यासाठी आपली तांत्रिक आणि प्रशासकीय यंत्रणा मजबूत करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार, ही कारवाई करण्यात आली असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

### ‘रोमियो-ज्युलिएट’ तरतुदीचा विचार करा : सर्वोच्च न्यायालय
# पोस्को कायद्याचा गैरवापर थांबवा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** बालकांना लैंगिक अत्याचारापासून संरक्षण देण्यासाठी करण्यात आलेल्या पोस्को कायद्याच्या वाढत्या गैरवापरावर सर्वोच्च न्यायालयाने तीव्र चिंता व्यक्त केली आहे. हा कायदा अत्यंत उदात्त हेतूने तयार करण्यात आला असला तरी अनेक प्रकरणांमध्ये तो सूडबुद्धीने आणि वैयक्तिक शत्रुत्वासाठी वापरला जात असल्याचे न्यायालयाने नमूद केले. विशेषतः किशोरवयीन मुला-मुलींमधील संमतीने झालेल्या संबंधांमध्ये कठोर फौजदारी कारवाई केली जात असल्याची प्रवृत्ती गंभीर असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले.

न्यायमूर्ती संजय करोल आणि एन. कोटीश्वर सिंह यांच्या खंडपीठाने केंद्र सरकारला या समस्येकडे गांभीर्याने पाहण्याचे आवाहन करत पोस्को कायद्यात ‘रोमियो-ज्युलिएट’ स्वरूपाची तरतूद समाविष्ट करण्याचा विचार करण्यास सांगितले. अशा तरतुदीमुळे जवळच्या वयाच्या किशोरवयीन जोडप्यांना, ज्यांचे संबंध परस्पर संमतीने आहेत, अनावश्यक गुन्हेगारी खटल्यांपासून संरक्षण मिळू शकते, असे न्यायालयाचे मत आहे.

उत्तर प्रदेश राज्य विरुद्ध अनुरुद्ध या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवले. या प्रकरणात अलाहाबाद उच्च न्यायालयाने पोस्को अंतर्गत एका आरोपीला जामीन देताना राज्यभर लागू होतील असे व्यापक निर्देश दिले होते. त्यात प्रत्येक पोस्को प्रकरणात तपासाच्या सुरुवातीलाच पीडितेच्या वयाची वैद्यकीय चाचणी अनिवार्य करण्याचा आणि शालेय किंवा जन्म प्रमाणपत्रांवर शंका असल्यास जामीन नाकारण्याचा दृष्टिकोन होता.

सर्वोच्च न्यायालयाने हे निर्देश बाजूला सारत उच्च न्यायालयाने जामीन अर्जाच्या मर्यादित अधिकारक्षेत्रापलीकडे जाऊन आदेश दिल्याचे स्पष्ट केले. जामीनावर सुनावणी करताना न्यायालय केवळ आरोपीला अटकपूर्व किंवा अटकेनंतर दिलासा द्यायचा की नाही, यापुरताच निर्णय घेऊ शकते. तपास प्रक्रियेत बदल करणे किंवा सर्वसाधारण धोरणात्मक निर्देश देणे हे त्या टप्प्यावर न्यायालयाच्या अधिकारात येत नाही, असे खंडपीठाने ठामपणे सांगितले. जामीन न्यायालये लघु-चाचण्या घेऊ शकत नाहीत किंवा वयासारख्या वादग्रस्त मुद्द्यांवर अंतिम निष्कर्ष काढू शकत नाहीत, असेही स्पष्ट करण्यात आले. उच्च न्यायालयाचे निर्देश नाकारतानाच सर्वोच्च न्यायालयाने पोस्को कायद्याच्या गैरवापराकडे लक्ष वेधले. न्यायालयाने नमूद केले की, अनेकदा तरुणांच्या संमतीने झालेल्या नात्यांना विरोध करणारी कुटुंबे हा कायदा दबावाचे हत्यार म्हणून वापरतात. खंडपीठाने स्पष्ट शब्दांत म्हटले की, मुलांचे संरक्षण करण्यासाठी बनवलेला पवित्र कायदा जेव्हा सूड आणि वैयक्तिक वैराचे साधन बनतो, तेव्हा न्यायाच्या संकल्पनेलाच तडा जातो. खरे बळी, ज्यांना संरक्षणाची नितांत गरज आहे, ते अनेकदा गरिबी, भीती आणि सामाजिक कलंकामुळे न्यायव्यवस्थेपर्यंत पोहोचू शकत नाहीत. दुसरीकडे, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम लोक कायद्याचा गैरफायदा घेत असल्याचे चित्र दिसते, ही गंभीर असमानता असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले.

# कर्नाटकातील हेट स्पिच विधेयक राज्यपालांकडे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बेंगळुरू :** कर्नाटकच्या संयुक्त विधिमंडळाने डिसेंबरमध्ये देशातील पहिले हेट स्पिच विधेयक मंजूर केले असून, ते केंद्रीय कायद्याच्या तरतुदींपेक्षा अधिक कठोर आहे. तथापि, कर्नाटक द्वेषयुक्त भाषण आणि द्वेषपूर्ण गुन्हे (प्रतिबंध) विधेयक, २०२५ या मसुद्यावर तज्ञ आणि राजकीय वर्गातून अस्पष्ट वाक्यरचना आणि कठोर दंडात्मक तरतुदी यावर तीव्र टीका झाली आहे. विधेयक सध्या राज्यपाल थावर चंद गेहलोत यांच्याकडे संमतीसाठी प्रलंबित आहे.

गेल्या तीन वर्षांत द्वेषपूर्ण भाषणांमध्ये वाढ झाल्यामुळे, विशेषतः मंगळुरू ते कारवारच्या सांप्रदायिकदृष्ट्या संवेदनशील किनारपट्टीत, या विधेयकाची निर्मिती करण्यात आली. जुलै २०२२ मध्ये मोहम्मद फाझिलच्या हत्येतील कथित प्रमुख भूमिकेच्या बदला म्हणून मे २०२५ मध्ये मंगळुरू येथे हिंदू कार्यकर्ता सुहास शेट्टीची हत्या झाली होती, ज्यामुळे हा विधेयक प्रखर चर्चेचा विषय बनला. गृहमंत्री डॉ. जी. परमेश्वर यांनी विधेयकाचे समर्थन करताना सांगितले की, भारतीय न्याय संहिता, २०२३ मध्ये द्वेषपूर्ण भाषणांविरुद्ध कलमे असली तरी ती पुरेशी कठोर नाहीत. त्यांनी म्हटले की सर्वोच्च न्यायालयानेही असे मत मांडले आहे की अशा गुन्ह्यांवर कठोर कारवाई केली पाहिजे कारण ते समाजात असंतोष निर्माण करतात.

विरोधकांचा आरोप आहे की हे विधेयक अभिव्यक्ती स्वातंत्र्य मर्यादित करते आणि सरकारला राजकीय विरोधकांवर कारवाई करण्याची मुभा देते. काही तज्ज्ञांनी विधेयकाचे स्वागत करत, म्हटले की ते समाजात असंतोष निर्माण करणाऱ्या आणि दुष्ट इच्छा पसरवणाऱ्या शक्तींवर नियंत्रण ठेवेल. मात्र, याची अंमलबजावणी ही कर्नाटक सरकारच्या हेतूंवर अवलंबून असेल. विरोधकांचा आवाज दाबण्यासाठी याचा वापर केला जाईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

विधेयकानुसार, द्वेषपूर्ण भाषण करणाऱ्याला एक वर्षापासून सात वर्षांपर्यंत तुरुंगाची शिक्षा आणि दंड ठोठावता येईल. पुनरावृत्ती झाल्यास शिक्षा दोन वर्षांपासून दहा वर्षांपर्यंत वाढवता येईल आणि दंडही १ लाख रुपयांपर्यंत जाऊ शकतो.

### इस्लामाबादमध्ये सिलिंडरचा स्फोट; ८ ठार

**इस्लामाबाद :** पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादमध्ये रविवारी पहाटे झालेल्या गॅस सिलेंडरच्या स्फोटात एका नवविवाहित जोडप्यासह आठ जणांचा मृत्यू झाला. अधिकाऱ्यांनी सांगितले की, सेक्टर जी-७/२ मधील एका घरात ही घटना घडली जिथे लग्न चालू होते. बचाव अधिकाऱ्यांनी सांगितले की, आठ जणांचा मृत्यू झाला आणि ११ जण जखमी झाले, तर बचावकर्त्यांनी १९ जणांना ढिगाऱ्याखालून बाहेर काढले. किमान चार घरांचे नुकसान झाले आहे. मृतांमध्ये वधू आणि वर यांचाही समावेश आहे.

# मध्य प्रदेशात आता स्वच्छ जल अभियान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भोपाळ :** इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे होणाऱ्या मृत्यूंच्या पार्श्वभूमीवर मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांनी राज्यव्यापी स्वच्छ जल अभियान सुरू केले.

या उपक्रमात पाणी आणि सांडपाणी पाईपलाईनचे जीआयएस मॅपिंग, छेदनबिंदू ओळखणे आणि रोबोट वापरून गळती तपासणी हे मोहिमेचे प्रमुख घटक असतील.

जल सुरक्षा, संवर्धन आणि तक्रार निवारण मजबूत करण्याच्या उद्देशाने, ही मोहीम दोन टप्प्यात राबविली जाईल, पहिला टप्पा १० जानेवारी ते २८ फेब्रुवारी आणि दुसरा टप्पा १ मार्च ते ३१ मार्च दरम्यान राबविला जाईल. नागरिकांच्या हक्काचे ऐकले जाण्याची आणि स्वच्छ पिण्याच्या पाण्याची हमी देण्याची खात्री करण्यासाठी, प्रभावी अंमलबजावणीसाठी जनजागृती आणि समुदायाच्या सहभागावर लक्ष केंद्रित करण्यासाठी आणि १८१ (द सीएम हेल्पलाइन) द्वारे पिण्याच्या पाण्याशी संबंधित तक्रारी नोंदवण्यासाठी विशेष तरतूद करण्यासाठी या मोहिमेत दर मंगळवारी जल सुनवाई (जनसुनावणी) देखील असेल. तसेच, अर्जदारांना योग्यरित्या माहिती देऊन, पिण्याच्या पाण्याच्या समस्यांशी संबंधित अर्जांच्या वेळेवर निपटारा करण्यावर देखील ते एकात्मिकपणे लक्ष केंद्रित करेल.

### पोलिसांच्या कारवाईत आंतरराष्ट्रीय कनेक्शन उघड
# ‘डिजिटल अरेस्ट’च्या रॅकेटचा पर्दाफाश

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** दिल्ली पोलिसांनी शनिवारी ‘डिजिटल अरेस्ट’ या संकल्पनेचा वापर करून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या आंतरराष्ट्रीय सायबर रॅकेटचा पर्दाफाश केला. दहशतवादविरोधी पथकातील अधिकारी असल्याचे भासवून फोनद्वारे धमक्या देत या टोळीने हजारो लोकांकडून सुमारे १०० कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. या रॅकेटचे धागेदोरे पाकिस्तानसह अनेक देशांपर्यंत पोहोचले असून आतापर्यंत सात जणांना अटक करण्यात आली आहे.

दिल्ली पोलिसांच्या आयएफएसओ युनिटचे उपायुक्त विनीत कुमार यांनी सांगितले की, सप्टेंबर २०२५ पासून हा घोटाळा सुरू होता. आरोपी पीडितांना फोन करून त्यांचे मोबाइल क्रमांक पहलगाम दहशतवादी हल्ला किंवा दिल्लीतील लाल किल्ला स्फोटासारख्या घटनांमध्ये वापरले गेल्याचा दावा करायचे. तात्काळ अटक होईल अशी भीती दाखवून ‘डिजिटल अरेस्ट’च्या नावाखाली पैसे हस्तांतरित करण्यास भाग पाडले जात होते. या फसवणुकीमागे चीन, नेपाळ, कंबोडिया, तैवान आणि पाकिस्तानशी संबंधित आंतरराष्ट्रीय सायबर गुन्हेगार सक्रिय असल्याचे तपासात उघड झाले आहे.

तपासादरम्यान या सिंडिकेटने बेकायदेशीर सिमबॉक्स उपकरणांचा मोठ्या प्रमाणावर वापर केल्याचे स्पष्ट झाले. या उपकरणांमुळे परदेशातून येणारे कॉल भारतीय स्थानिक कॉलसारखे दिसत होते. विशेषतः कंबोडियातून केलेले कॉल सिमबॉक्सच्या माध्यमातून भारतातील नंबरवरून आल्यासारखे भासवले जात होते. फसवणूक करणाऱ्यांनी मुद्दाम रजी नेटवर्कचा वापर केला, ज्यामुळे रिअल-टाइम ट्रॅकिंग कठीण व्हावे. सिमबॉक्सद्वारे आयएमईआय क्रमांक बदलले आणि फिरवले जात असल्याने एकाच क्रमांकावरून एका दिवसात वेगवेगळ्या शहरांतून कॉल आल्याचा आभास निर्माण होत होता.

फॉरेन्सिक तपासणीत पाच हजारांहून अधिक आयएमईआय क्रमांक आणि जवळपास वीस हजार सिम कार्ड या नेटवर्कशी जोडलेले असल्याचे आढळले. दिल्ली, मुंबई आणि मोहाली येथून २२ सिमबॉक्स उपकरणे, मोबाईल फोन, लॅपटॉप, राउटर, सीसीटीव्ही कॅमेरे, पासपोर्ट आणि परदेशी सिम कार्ड पोलिसांनी जप्त केली आहेत.

अनेक तक्रारी आल्यानंतर सप्टेंबरमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आणि सुमारे २५ पोलिस अधिकाऱ्यांची विशेष तपास पथक तयार करण्यात आली. भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र आणि दूरसंचार विभागाच्या मदतीने तांत्रिक चौकशी सुरू करण्यात आली.

चेन हा संपूर्ण नेटवर्कचा तांत्रिक सूत्रधार असून तो तैवानमधील गुन्हेगारी सिंडिकेटसाठी काम करत असल्याचे निष्पन्न झाले आहे. पंजाबमधील मोहाली येथे आणखी एक सिमबॉक्स केंद्र सापडले, जिथून सरबदीप सिंग आणि जसप्रीत कौर यांना अटक करण्यात आली. एक पाकिस्तानी हँडलर आर्थिक मदत आणि निर्देश देत असल्याचा संशय असून पाकिस्तानी आयएमईआय क्रमांक वापरल्याचेही उघड झाले आहे. नागरिकांनी अशा धमकीच्या फोनकॉल्सना बळी न पडता तातडीने सायबर क्राईम हेल्पलाइनवर तक्रार करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.